RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२१३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.२० सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## काँग्रेसला महाराष्ट्रात संधी देऊ नका, त्यांच्या धोकेबाजीपासून सावध राहा : पीएम मोदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०वर्धा**

शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून विविध निर्णय घेतले जात आहेत. शेतकऱ्यांसाठी सरकारने अनेक चांगले निर्णय घेतले आहेत. त्याचे परिणामही लवकरच दिसतील. शिंदे सरकाने शेतकऱ्यांचे वीजबिल झिरो केले. सिंचनाच्या समस्या सोडविण्यसाठी प्रयत्न सुरू केले. पण मध्येच असे सरकार आले होते त्यांनी या सगळ्या कामांना ब्रेक लावला. पण पुन्हा आमचं सरकार आल्यानंतर कामांना सुरुवात केली. शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठीही आम्ही काम करत आहोत. पण आता तुम्हालाही एक खबरदारी घ्यावी लागेल. ज्या काँग्रेसनं शेतकऱ्यांचं वाटोळं केलं धोका दिला, ओबीसींना कधीच पुढे जाऊ दिले नाही त्यांना पुन्हा संधी द्यायची नाही, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदींनी काँग्रेसवर एकापाठोपाठ वार केले.

केंद्र सरकारच्या विश्वकर्मा योजनेच्या वर्षपूर्तीनिमित्त वर्धा शहरात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पीएम मोदींनी काँग्रेस आणि महाविकास आघाडीवर घणाघाती टीका केली. यावेळी केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी, जयंत चौधरी, राज्याचे राज्यपाल राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, देवेंद्र फडणवीस आदी उपस्थित होते.

मोदी पुढे म्हणाले, महाराष्ट्रातील जनतेने यांच्या धोकेबाजीपासून सावध राहण्याची गरज आहे. कारण आजच्या काळातील काँग्रेस वेगळी आहे. त्यांच्यातील देशभक्तीचा आत्मा आता मरण पावला आहे. त्याच्या जागी आता द्वेषाचं भूत काँग्रेसच्या अंगात संचारलं आहे. काँग्रेस नेत्यांची भाषा पाहा. विदेशात जाऊन देश तोडण्याची, देशाची संस्कृती आणि आस्थेचा अपमान



करणारी वक्तव्ये दिली जात आहेत. तुकडे तुकडे गँगच आज काँग्रेसला चालवत आहेत. आज काँग्रेस देशातील सर्वात भ्रष्ट पक्ष बनला आहे. काँग्रेस परिवार देशातील सर्वाधिक भ्रष्ट परिवार बनला आहे, अशी घणाघाती टीका मोदींनी केली.

आजच्या काँग्रेसला तर गणपती पूजेचीही चीड येते. स्वातंत्र्याच्या लढ्यात गणेशोत्सव भारताच्या एकतेचा सर्वात मोठा उत्सव बनला होता. यामुळेच काँग्रेसला गणपती पूजा त्रासदायक वाटते. तुष्टीकरणासाठी काँग्रेस काहीही करू शकते. कर्नाटकात तर काँग्रेस सरकारने गणपतीलाच गजाआड केलं. ज्यावेळी अख्खा महाराष्ट्र गणपतीची आराधना करत होता त्यावेळी कर्नाटकात गणपतीची मूर्ती गजाआड केली जात होती. विशेष म्हणजे काँग्रेसच्या मित्रपक्षांवरही काँग्रेसचा इतका रंग चढला की त्यांनीही या प्रकारावर चकार शब्दही काढला नाही, असे मोदी म्हणाले.

राज्यात याआधीच्या महाविकास आघाडी सरकारने कपाशीला ताकद देण्याऐवजी शेतकऱ्यांचं मोठं नुकसान केलं. शेतकऱ्यांच्या नावाने फक्त राजकारण आणि भ्रष्टाचार केला. नंतर २०१४ मध्ये फडणवीसांनंतर खरं काम सुरू झालं. अमरावतीत टेक्सटाईल पार्क आला. हा पार्क येथे येण्याआधी या भागात एकही उद्योग येत नव्हता. पण आज हाच भाग राज्यासाठी मोठं औद्योगिक केंद्र बनत चालला आहे, अशा शब्दांत मोदींनी महायुती सरकारच्या कामाचं कौतुक केलं.

### पोलिसांनी गणपती मूर्ती घेतली ताब्यात मोदींचे ठाकरेंवरही टीकेचे बाण

कर्नाटकात आंदोलन करणाऱ्यांना ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी त्यांच्याकडील गणपतीची मूर्ती गाडीत ठेवली होती. त्या प्रकाराबद्दल बोलताना मोदी म्हणाले, तुम्ही बघितले असेल की, कर्नाटकमध्ये काँग्रेस सरकारने गणपती बाप्पालाच कैद केले. गणपतीच्या ज्या मूर्तीची लोक पूजा करत होते, ती पोलिसांच्या गाडीत ठेवली गेली. महाराष्ट्र गणपतीची आराधना करत होता आणि कर्नाटकात गणपतीची मूर्ती पोलीस व्हॅनमध्ये होती. गणपतीच्या अपमानामुळे पूर्ण देशात आक्रोश आहे. मी अचंबित आहे की, यावर काँग्रेस मित्रपक्षांच्या तोंडांनाही टाळे लागले आहेत. त्यांच्यावरही काँग्रेसच्या संगतीचा असा परिणाम झालाय की, गणपतीच्या अपमानाचा विरोध करण्याची त्यांच्यात हिंमत राहिलेली नाही, असे म्हणत मोदींनी उद्धव ठाकरेंना अप्रत्यक्षपणे लक्ष्य केले.

## फडणवीसांकडून मोदींसमोर कौतुक नवनीत राणा यांचे डोळे पाणावले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० नांदगाव पेठ**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते वर्धा वरून अमरावती टेक्सटाईल पार्कचं ई भूमिपूजन झालं.. अमरावती एमआयडीसी याठिकाणी ई कार्यक्रम ठिकाणी भाजप खासदार अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा, आमदार रवी राणा इतर नेते मंडळी आणि शासकीय अधिकारी उपस्थित होते यावेळी नवनीत राणा यांच्या डोळ्यात अश्रू अनावर झाल्याचं पाहायला मिळाले.. देवेंद्र फडणवीस यांनी अमरावती टेक्सटाईल पार्कसाठी नवनीत राणा यांनी देखील पाठपुरावा



केला असा उल्लेख करताच नवनीत राणा ह्या भावुक झाल्या.. यावेळी नवनीत राणाशी बातचीत केली तेव्हा त्या म्हणाल्या की, ते आनंदाचे अश्रू होते...

पीएम मित्रा योजनेअंतर्गत केंद्र सरकारने अमरावतीमध्ये मेगा टेक्सटाईल पार्क घोषित केला आहे... देशात सात शहरांत अशाप्रकारचे पार्क होणार असून यामध्ये अमरावतीचा समावेश आहे.. अमरावतीच्या प्रकल्पात १० हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. यात तब्बल ३ लाख लोकांना रोजगार मिळणार असल्याने मोठ्या प्रमाणावर रोजगार विदर्भातील युवकांना मिळणार आहे.. नांदगाव पेठ औद्योगीक वसाहती जवळील हा प्रकल्प होणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते ई भूमिपूजन झाले...

## प्रधानमंत्र्यांच्या हस्ते पीएम मित्रा टेक्स्टाईल पार्कचे ई-भूमिपूजन

### नांदगाव पेठ पार्क क्रांतिकारी पाऊल : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

अमरावती येथील पीएम मित्रा टेक्स्टाईल पार्कमुळे देशाच्या अर्थकारणाला हातभार लागणार आहे. याठिकाणी तीन लाख प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार आहेत. टेक्सटाईल पार्कमुळे याठिकाणी आमुलाग्र बदल होणार आहेत. या भागाच्या औद्योगिक क्रांतीसाठी हे क्रांतीकारी पाऊल आहे, असे प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केले. त्यांच्या हस्ते वर्धा येथून नांदगाव पेठ येथील पीएम मित्रा पार्कचे ई-




भूमिपूजन करण्यात आले.

नांदगाव पेठ येथील अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्र येथे वर्धा येथील कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले. खासदार डॉ. अनिल बोंडे, नवनीत राणा, आमदार रवी राणा, डिगर गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रज्ञा बाजारे, पिंपर विहीरच्या सरपंच मुक्ता ठाकरे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता ए. बी. डाबेराव, सहायक पोलिस आयुक्त सागर पाटील, के. एम. पुंडकर, प्रादेशिक अधिकारी प्रशांत पडाळकर, वस्त्रोद्योग उप वस्त्रोद्योग अभियंता सुधीर अमृतकर, तहसीलदार वैशाली पाथरे, उप अभियंता संजय विधळे, उप अभियंता श्री. राठोड, क्षेत्र व्यवस्थापक सुभाष राऊत आदी उपस्थित होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले, पीएम मित्रा टेक्स्टाईल पार्क ही वस्त्रोद्योग क्षेत्रात क्रांती आणणारी योजना आहे. पीएम मित्रा टेक्सटाईल पार्क येथे जागतिक दर्जाच्या औद्योगिक पायाभूत सुविधा निर्माण केल्या जातील. यामुळे थेट शेतातून विदेशात निर्यात होणारे कापड निर्मितीकरीता संपूर्ण पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येतील. नांदगाव पेठ येथील अतिरिक्त अमरावती औद्योगिक क्षेत्रात १ हजार हेक्टर जागेमध्ये पीएम मित्रा पार्क उभारण्यात येणार आहे. येथे १० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. निर्यात क्षमता वाढीसाठी फाईव्ह एफ व्हिजन ठेवण्यात आले आहे. यामध्ये फार्म ते फायबर, फायबर ते फॅब्रिक, फॅब्रिक टू फॅशन आणि फॅशन ते फॉरेन अशा पद्धतीने कार्यप्रणाली राबविण्यात येणार आहे. पीएम मित्रा टेक्सटाईल पार्कमुळे अमरावतीचे नाव देशाच्या नकाशावर अधोरेखित होणार आहे.

## मुख्यमंत्री म्हणाले राहुल गांधी विदेशात देशाची बदनामी करतात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०नागपूर**

राहुल गांधी यांच्याबाबत केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचे समर्थन करत नाही मात्र ते विदेशात जातात आणि देशाच्या विरोधात बोलून बदनामी करतात. देशात राहतात तेव्हा ते काहीच बोलत नाही, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे केली.



गुरुवारी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. खोटे बोलायचे आणि ते रेटून बोलायचे असा एकच कार्यक्रम विरोधी पक्षाचा सुरू आहे. विदेशात जाऊन देशाची बदनामी करण्याचे काम केले जात आहे. आरक्षण बंद करण्याचे बोलत असतील, पण देशात कोणी आरक्षण हटवू शकत नाही आणि संविधान कोणी बदलू शकणार नाही असेही शिंदे म्हणाले.

जम्मु काश्मीरमधील ३७० कलम हटवण्या संदर्भात काँग्रेसचे नेते वक्तव्य करतात. मात्र आज ३७० कलम लागू केल्यामुळे कश्मीरमध्ये कोणीही जाऊ शकतो, फिरू शकतो आणि व्यवसाय सुद्धा करू शकतो. विरोधकांचा मात्र सत्ताधाऱ्यांनी सुरू केलेल्या योजनेला विरोध करणे हा एकमेव कार्यक्रम सुरू असून त्यांच्या या उद्योगाचा निषेध करतो असेही शिंदे म्हणाले.

## बंगालमध्ये पुरामुळे विध्वंस, अनेक जिल्हे बुडाले; ममता बॅनर्जींनी मोदींना मागितली मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०कोलकाता**

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिलं आहे. या पत्रात ममता यांनी राज्यात पुरामुळे झालेल्या प्रचंड विध्वंसाचा सामना करण्यासाठी केंद्राकडून निधी तातडीने जारी करण्याची विनंती केली आहे. आपल्या ट्विटर अकाऊंटवरून देखील ममता यांनी याबाबत ट्विट केलं आहे.

ममता बॅनर्जी म्हणाल्या की, डीव्हीसी (दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन) च्या मालकीच्या मॅथॉन आणि पंचेत धरणांतून सुमारे ५ लाख क्युसेक



पाणी सोडण्यात आलं. इतकं पाणी सोडल्यामुळे दक्षिण बंगालमधील सर्व जिल्हे म्हणजेच पूर्व बर्धमान, पश्चिम बर्धमान, बांकुरा, हावडा, हुगळी, पूर्व मेदिनीपूर आणि पश्चिम मेदिनीपूर मोठ्या समस्यांना तोंड देत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात पाणी कधीच सोडण्यात आलं नव्हतं.

**२००९ नंतरचा सर्वात मोठा पूर**

राज्य सध्या २००९ नंतरच्या सर्वात मोठ्या पुराचा सामना करत आहे. माझी तुम्हाला विनंती आहे की, तुम्ही या प्रकरणाचा गांभीर्याने विचार करा आणि संबंधित मंत्रालयांना या समस्या लवकर सोडवण्यासंबंधित महत्त्वाच्या सूचना द्या. ममता बॅनर्जी यांनी नरेंद्र मोदींना लिहिलेल्या पत्रात पुढे म्हटलं आहे की, मी याला मानवनिर्मित पूर म्हणत आहे कारण ही परिस्थिती नीट माहिती न घेतल्यामुळे निर्माण झाली आहे.

## सर्वोच्च न्यायालयाचं यूट्यूब चॅनल हॅक? कोलकाता बलात्कारसह महत्त्वाच्या प्रकरणांची चालू आहे सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० नवी दिल्ली**

सर्वोच्च न्यायालयाच्या यूट्यूब चॅनलवर शुक्रवारी दुपारी अचानक सलग जाहिराती चालू झाल्या. काही युजर्सला क्लिक केल्यानंतर थेट दुसऱ्याच कुठल्यातरी यूट्यूब चॅनलवर जावं लागत असल्याचा अनुभव समोर आला. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाचं यूट्यूब चॅनल हॅक झालं असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



विशेषत: एक दिवसापूर्वीच कोलकाता प्रशिक्षणार्थी डॉक्टर बलात्कार व हत्या प्रकरणाची सुनावणी प्रक्षेपित न करण्याची मागणी सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली होती. यासह काही महत्त्वाच्या प्रकरणांची सुनावणी सध्या सर्वोच्च न्यायालयात चालू आहे.

इंडियन एक्स्प्रेसनं यासंदर्भातील आपल्या वृत्तामध्ये सर्वोच्च न्यायालयातील एका पदाधिकाऱ्याची नाव न सांगण्याच्या अटीवर देण्यात आलेली प्रतिक्रिया नमूद केली आहे. नेमकं काय घडलंय याबाबत मला कल्पना नाही. पण आमच्या वेबसाईटच्या सुरक्षेमध्ये काहीतरी गडबड झाल्याचं दिसत आहे. शुक्रवारी सकाळी हा सगळा प्रकार उघड झाला. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या आयटी विभागानं याबाबत काम सुरू केलं असून नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटर अर्थात एनआयसीकडेही याची नोंद केली आहे, असं या पदाधिकाऱ्यानं सांगितलं.

## संत ज्ञानोबा - तुकोबांच्या पादुका पोहोचल्या लंडनला; विश्वभ्रमण दिंडीचे दुसरे वर्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० लंडन**

श्री संत ज्ञानोबा - तुकोबा विश्वभ्रमण दिंडीचे लंडन येथे भारतीय बांधवांनी मोठ्या भक्तिभावे स्वागत केले. विश्वभ्रमण दिंडीचे हे दुसरे वर्ष आहे. यावर्षी श्री ज्ञानोबा तुकोबांच्या पादुकांसह स्वामी समर्थांच्या पादुकाही हरिनाम गजरात लंडनला नेण्यात आल्या आहेत.

नोकरीनिमित्त विदेशात राहणाऱ्या भारतीयांना संतांच्या पादुकांचे प्रत्यक्ष दर्शन घडावे, त्यांना वारकरी कीर्तन, भजनाचा आनंद मिळावा यासाठी सदर



दिंडीचे आयोजन केले जात आहे. यापूर्वी पहिल्यांदा २०२२ मध्ये दुबईला विश्वभ्रमण दिंडी नेण्यात आली होती. त्यावेळी या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला होता. इतर देशांत राहणाऱ्या भारतीय भाविकांनी त्यांनाही संतांच्या पादुकांचे दर्शन व्हावे अशी इच्छा व्यक्त केल्याने यावर्षी लंडनला दिंडीचे आयोजन केले आहे.

तत्पूर्वी तीर्थक्षेत्र आळंदीतील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात अभिषेक, मंदिर प्रदक्षिणा करण्यात आली. चलपादकांचे शांतिब्रह्म मारुती महाराज कुरेकर, जेष्ठ सिने अभिनेता मोहन जोशी, खेडचे प्रांत अधिकारी अनिल दौड, आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त ॲड. राजेंद्र उमाप, देहू देवस्थान माजी अध्यक्ष ह. भ. प. नितीन महाराज मोरे, डी. जी. पी. नंद्र निकम, ज्ञानेश्वर बोडके, डी. डी. भोसले, रामशेठ गावडे, विठ्ठल शिंदे आदींच्या हस्ते पूजन करून दिंडी लंडनकडे मार्गस्थ झाली.

लंडन येथे हेथ्रो विमान तळावर स्लॉव्ह मित्र मंडळ स्लॉव्ह साव्ह लंडन यांच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष मंदार मिराशी, आनंद पंडित, देसाई साहेब, सागरजी खिंडारे व सागर कुलकर्णी यांनी पारंपरिक पद्धतीने स्वागत केले.

## संपादकीय ......

# पॉलिग्राफ चाचणी : सत्य शोधण्याचा मार्ग

*गुन्ह्यांची उकल करण्यासाठी पोलिस आणि तपास यंत्रणा विविध पद्धतींचा अवलंब करत असतात. यामध्ये अलीकडील काळात पॉलिग्राफ चाचणीही केली जाते. याचा प्रयोग पहिल्यांदा १९ व्या शतकात इटलीतील गुन्हे संशोधक सेसारे लोम्बोसो यांनी केला होता. त्यानंतर १९१४ मध्ये अमेरिकी मानसशास्त्रज्ञ विल्यम मेरस्ट्रॉन आणि १९२१ मध्ये कॅलिफोर्नियाचे पोलिस अधिकारी जॉन लार्सन यांनीही अशाच प्रकारचे उपकरण तयार केले.*

*कोलकाता येथील आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील बलात्कार आणि हत्या प्रकरणाचा उलगडा करण्यासाठी आता संशयितांची पॉलिग्राफ चाचणी केली जात आहे. यानिमित्ताने पॉलिग्राफ चाचणीने या प्रकरणाचा गुंता कसा उलगडू शकतो आणि ही चाचणी कशा रीतीने मदत करते, हे जाणून घेणे औचित्याचे ठरेल. एखाद्या गुन्ह्याचा शोध लवकर लागत नसेल तर पोलिस यंत्रणा विविध माध्यमांतून आरोपींपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत असतात. हत्या, बलात्कार, चोरी, दरोडा, फसवणूक, अपहरण, खंडणी, दहशतवादी हल्ला यासारख्या गुन्ह्यांत काही वेळा तपास लवकर लागतो,अशावेळी नार्को टेस्ट, पॉलिग्राफ चाचणी किंवा क्राईम सीन याद्वारे शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो. आर. जी. कर महाविद्यालयाच्या प्रकरणाने देशभरात खळबळ उडाली असताना सीबीआयने ४ कर्मचार्यांची पॉलिग्राफ चाचणी करण्याचा निर्णय घेतला आहे. यात पहिल्या वर्षात शिकणारे पीजीटी डॉक्टर अर्का व सौमित्र यांचा समावेश आहे. शिवाय एक हाऊस स्टाफ गुलाम व एक इंटर्न सुभदीप याचाही समावेश आहे. पॉलिग्राफ चाचणी या प्रकरणाचे रहस्य कशा प्रकारे उलगडू शकते, हे पाहणे महत्त्वाचे आहे. फॉरेन्सिक सायकॉलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. पुनीत पुरी यांच्या मते, पॉलिग्राफ चाचणीसाठी कोर्टाकडून परवानगी घ्यावी लागते. पॉलिग्राफ चाचणी ही नार्को चाचणीपेक्षा वेगळी असते. यात आरोपीला बेशुद्ध करण्याचे इंजेक्शन दिले जात नाही. उलट कार्डिओ कफसारख्या मशिनचा वापर केला जातो. या मशिनच्या माध्यमातून रक्तदाब, नाडी, श्वास, घाम, रक्तप्रवाह यांचे आकलन केले जाते. यानंतर आरोपीला प्रश्न विचारण्यात येतात. खोटे बोलल्यास तो भयभीत होतो आणि त्याचवेळी मशिन हे शरीरातील बदल हेरते. २०१० मध्ये एका खटल्याच्या सुनावणीत सुप्रीम कोर्टाच्या मतानुसार पॉलिग्राफ चाचणीवेळी आरोपींनी मांडलेली मते ही पुरावा म्हणून ग्राह्य धरली जाणार नाहीत. उलट ते पुरावे गोळा करण्याचा एक मार्ग राहू शकतो. असे समजा की, जर पॉलिग्राफ चाचणीत हत्या प्रकरणातील आरोपी गुन्ह्यात वापरलेल्या शस्त्राचे ठिकाण सांगत असेल तर त्याला पुरावा मानता येणार नाही; परंतु आरोपीने सांगितलेल्या ठिकाणी शस्त्र सापडत असेल, तर त्याला पुरावा म्हणून ग्राह्य धरले जाईल. पण, न्यायालय असेही म्हणते की, अशा चाचण्यांच्या माध्यमातून एखाद्या व्यक्तीच्या खासगी आयुष्यात मानसिक प्रक्रियेद्वारे जबरदस्तीने घुसखोरी करणे हे त्याच्या स्वातंत्र्याच्या व मूलभूत हक्काच्या विरोधात आहे.*

***न्यूमोग्राफ*** *: व्यक्तीच्या श्वास घेण्याच्या पॅटर्नचे आकलन करून श्वास घेण्याच्या प्रक्रियेतील बदल जाणून घेतला जातो.*

***कर्डिव्हस्क्युलर रेकॉर्डर*** *: एखाद्या व्यक्तीच्या हृदयाचे ठोके आणि रक्तदाबाचे आकलन केले जाते.*

***गेल्वेनोमीटर :*** *मशीनच्या स्क्रीनवर येणार्या घामाच्या ग्रंथींतील बदलाचे आकलन करते.*

***रेकॉर्डिंग डिव्हाईस*** *: पॉलिग्राफ मशिनच्या सर्व सेन्सरने मिळणारा डेटा रेकॉर्ड करत त्याचे विश्लेषण करते. कंट्रोल क्वेश्चन टेस्ट : सर्वात पहिले म्हणजे व्यक्तीला पॉलिग्राफ मशिनला जोडल्यानंतर त्याला सामान्य प्रश्न विचारले जातात. या प्रश्नांची उत्तरे होय किंवा नाही अशी असतात. जेव्हा तो एखाद्या सामान्य प्रश्नाचे उत्तर देतो आणि त्याच घटनेतील एखाद्या कठीण प्रश्नाचे उत्तर देतो, तेव्हा या दोन्हीतील फरक जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. उत्तर देताना शरीराची प्रतिक्रिया समजून घेतली जाते. यावेळी श्वास घेण्याची गती, नाडी, रक्तदाब, घाम यावरून एखादी व्यक्ती खरे बोलत आहे की खोटे, हे समजून घेतले जाते.*

***गिल्टी नॉलेज टेस्ट :*** *या प्रश्नांत अनेक प्रकारची उत्तरे असतात. सर्व प्रश्न गुन्ह्याशी संबंधित असतात. उदा. एखादा आरोपी चोरी प्रकरणात पकडला जातो, तेव्हा त्याला अनेक प्रकारचे प्रश्न विचारले जातात. पाच हजार, दहा हजार, पंधरा हजारांची चोरी केली का? या प्रश्नाचे उत्तर त्याने अचूक दिले तर त्याच्या हृदयाचे ठोके बरोबर पडतील; परंतु खोटे बोलताना त्याच्या शारीरिक क्रिया वेगवान होतील. तो काहीतरी लपवत आहे, हे तत्काळ समजेल. अमेरिकी मानसशास्त्र संघटनेच्या मते, चौकशीदरम्यान शरीरात मानसिक बदल होतो व यावरून तो खरे बोलत आहे की खोटे, हे निश्चित सांगता येत नाही; पण एखादे सत्य शोधून काढण्याचे ते माध्यम राहू शकते. 'वंडरपोलिस'च्या अहवालानुसार, एखादी व्यक्ती आपल्या भावनेवर नियंत्रण ठेवत असेल तर तिच्यावर अशा चाचणीचा फारसा परिणाम होत नाही. एवढेच नाही, तर आरोपीने दिलेले उत्तर तज्ज्ञ खोटे असल्याचे सांगून त्याच्यावर दबाव टाकू लागले तर तो नर्व्हस होऊ लागतो. अशावेळी तो नर्व्हस झाला तर तो खोटे बोलत असल्याचे गृहीत धरले जाते. अर्थात, अनेक प्रकरणांत पॉलिग्राफ चाचणीच्या मदतीने आरोपींना पकडण्यात मदतच झाली आहे.*

# शेतकऱ्यांना कृषी पुरस्काराच्या वितरणासाठी सरकारकडून ८ कोटी १० लाखांचा निधी मंजूर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० अमरावती –** राज्यातील मागील तीन वर्षांतील कृषी क्षेत्रातील विविध पुरस्कार वितरण सोहळ्याला अखेर मुहूर्त मिळाला आहे. २९ सप्टेंबर रोजी मुंबई येते पीक स्पर्धेतील विजेते शेतकरी आणि कृषी क्षेत्रातील विविध पुरस्कार विजेत्या शेतकऱ्यांना पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. यामध्ये साधारण ४०० पुरस्कार विजेत्या शेतकऱ्यांचा सहभाग असणार आहे. या कार्यक्रमासाठी सरकारने ८ कोटी १० लाखांचा निधी मंजूर केला आहे.




दरम्यान, २०२०, २०२१ आणि २०२२ या वर्षांच्या विविध कृषी पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी ७ कोटी १५ लाख ६१ हजार रूपये आणि २०२३-२४ सालच्या खरीप हंगामातील पीकस्पर्धेतील विजेत्या शेतकऱ्यांच्या बक्षिसासाठी ९५ लाख ५ हजार रूपये असे एकूण ८ कोटी १० लाख ६६ हजार रूपये खर्च करण्यसाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. हा निधी आयुक्तालय आणि जिल्हास्तरावरून वितरित केला जाणार आहे.

शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि शेतीमधील उत्पादनात वाढ होण्यासाठी राज्य सरकारकडून विविध पातळीवर पुरस्कारांची आणि पीक स्पर्धेची घोषणा करण्यात येते. त्यामध्ये कृषी, संलग्न क्षेत्र आणि फलोत्पादन क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना पुरस्कार देण्यात येतो. यामध्ये कृषीरत्न, कृषीभूषण, सेंद्रीय शेतीतील कृषीभूषण, शेतीमित्र, युवा शेतकरी, उद्यानपंडित, शेतीनिष्ठ, कृषी सेवारत्न असे पुरस्कार देण्यात येतात.

कोरोनाचा प्रादुर्भाव आणि लॉकडाऊन मुळे मागील काही वर्षांमध्ये हा पुरस्कार वितरण सोहळा झाला नव्हता. त्यानंतर मागील तीन वर्षांचे म्हणजे २०२० ते २०२२ सालापर्यंतच्या तीन वर्षांचे कृषी पुरस्कार आणि पीकस्पर्धेतील विजेत्यांना पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. या पुरस्कारामध्ये रोख बक्षिसे आणि सन्मानचिन्हाचा सामावेश असतो. तर २९ सप्टेंबर रोजी मुंबईत होणाऱ्या या कार्यक्रमासाठी राज्य सरकारने ८ कोटी १० लाखांचा निधी मंजूर केला आहे.




## किडनी सक्षम, आरोग्य भक्कम

**दि.२० विदर्भ प्रजासत्ताक** निरोगी मूत्रपिंडाचा आजार आयुष्याचा कार्यकाळ व वेग कमी करू शकतो. शरीराची संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडू शकते. मूत्रपिंड खराब झाले तर हात आणि पाय यांना सूज येऊ शकते. रक्तदाबात वाढ होणे, हाडांमध्ये वेदना, अशक्तपणा, मळमळ, उलटी येणे आदी प्राथमिक लक्षणे आहेत.

ही लक्षणे अत्यंत धीम्या गतीने वृद्धिंगत होत राहातात. रोगी राहाण्यासाठी संपूर्ण शरीराची काळजी घेणे महत्त्वाचे आहेच. त्यातही शरीरातील किडनी किंवा मूत्रपिंडाचे आरोग्य चांगले राखणे गरजेचे आहे.मूत्रपिंडाचा आजार आयुष्याचा कार्यकाळ व वेग कमी करू शकतो. रक्त शुद्ध करणे, हार्मोन्स निर्माण करणे, खनिजे शोषून घेणे, शरीरातील विषारी पदार्थ बाहेर टाकणे आणि आम्लाचे संतुलन राखणे आदी कार्य मूत्रपिंड करत असते. दुर्दैवाने काही कारणाने जर मूत्रपिंड रोगग्रस्त झाले तर शरीराची संपूर्ण व्यवस्था कोलमडून पडू शकते, त्यावर प्रभाव पडू शकतो.

लाल रक्तपेशींचे उत्पादन आणि हाडांसाठी आवश्यक असलेले डी जीवनसत्त्वाचे चयापचय सर्वच बिघडते. दरवर्षी मूत्रपिंडाच्या विकारामुळे लाखो लोकांना जीव गमवावे लागतात. परंतु, योग्य वेळी योग्य उपचार झाल्यास रुग्णाचे प्राण वाचवता येतात.

वेदनाशामक गोळ्या किंवा प्रतिजैविके यांचेही दीर्घकाळ सेवन केल्यास मूत्रपिंडाचे नुकसान होते. मूतखडा किंवा प्रोस्टेट ग्रंथींची वाढ यामुळेही गुंतागुंत वाढू शकते. मूत्रपिंड खराब झाले तर हात आणि पाय यांना सूज येऊ शकते. रक्तदाबात वाढ होणे, हाडांमध्ये वेदना, अशक्तपणा, मळमळ, उलटी येणे आदी प्राथमिक लक्षणे आहेत.

ही लक्षणे अत्यंत धीम्या गतीने वृद्धिंगत होत राहातात. त्यामुळे रुग्णाला त्याविषयी काही समजत नाही. परिणामी योग्य वेळी उपचारही मिळत नाहीत. अनेकदा मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त रुग्णांच्या लघवीमधून प्रथिने आणि लाल रक्तपेशी जाऊ लागतात. त्याचबरोबर रक्तदाबही वाढतो. चेहरा आणि पाय यांना सूज येते.

त्वचेवर लाल चट्टे येऊ शकतात. सांधेदुखीचीही तक्रार जाणवू शकतो. मूत्रपिंड खराब झाल्यास काही लक्षणे मुख्यत्वे दिसून



येतात. रक्तदाबात वाढणे, डोळे, हात, पाय यांना सूज येणे, लघवीमधून रक्त जाणे, लघवीचा रंग बदलतो, लघवीमध्ये जास्त फेस येणे, कमी किंवा सतत लघवी होणे,रुग्णाची भूक कमी होते त्यामुळे व्यक्तीला खूप थकवा येतो. श्वासाला दुर्गंधी येते आणि तोंडाची चव गेल्याची तक्रारही रुग्ण करतात. मूत्रपिंडाची तपासणी करण्यासाठी किडनी फंक्शन टेस्ट केली जाते. मूत्रपिंड पूर्ण खराब झालेले असले तरीही डायलिसिस आणि मूत्रपिंड अश्वगंधामृत प्रत्यारोपणाच्या मदतीने रुणाला सामान्य आयुष्य जगणे शक्य होते. मूत्रपिंड प्रत्यारोपणासाठी उपयुक्त दात्याकडून मूत्रपिंड घेऊन रुग्णाच्या शरीरात प्रत्यारोपित केली जाते.

***मूत्रपिंडाच्या आजारापासून बचाव***

रोज दीड ते दोन लीटर पाणी प्यावे. त्यामुळे शरीरातील सोडियम, युरिया आणि विषारी घटक बाहेर पडण्यास मदत होते. मूत्रपिंडाला सूज आली असेल तर पातळ पदार्थांचे सेवन कमी प्रमाणात करावे. आरोग्यदायी भोजन करावे. मूत्रपिंड अशक्त झाले असल्यास आहारात प्रथिनांचे प्रमाण कमी असावे. पनीर, डाळी, शेंगवर्गीय भाज्या, सोयाबीन आदी पदार्थ सेवन करू नयेत. मिठाचे प्रमाणही कमी असावे. धूम्रपान आणि मद्यपान यांच्यापासून दूर रहावे. धूम्रपान केल्याने मूत्रपिंडातील रक्ताचा प्रवाह मंदावतो.

# गांडूळ खत तयार करण्यासाठी गांडूळाच्या उपयुक्त जाती कोणत्या

**विदर्भ प्रजासत्ताक**

गांडूळ हा जमिनीत राहणारा प्राणी आहे. तो जमिनीतील सेंद्रिय पदार्थ खातो. ते खाल्यानंतर त्याच्या शरीराला आवश्यक असा भाग सोडून उर्वरीत भाग विष्ठा म्हणून शरीरातून बाहेर टाकतो, त्यालाच गांडूळ खत किंवा वर्मिकंपोस्ट असे म्हणतात.

या क्रियेला २४ तासांचा कालावधी लागतो. गांडूळ जेवढे पदार्थ खातो त्यापैकी स्वतच्या शरीरासाठी फक्त दहा टक्के भाग ठेवतो व बाकीचा नव्वद टक्के भाग शरीरातून बाहेर टाकतो.

गांडूळ खतात वनस्पतीच्या वाढीसाठी लागणारी अन्नद्रव्ये, संप्रेरके, उपयुक्त जीवाणू असून वनस्पतीची रोग प्रतिकारक क्षमता वाढविते. गांडूळ खत हे भरपूर अन्नद्रव्ये, संप्रेरके असणारे दाणेदार सेंद्रीय खत असून जैविक गुणधर्म वाढविते. गांडूळ खत हा सेंद्रीय शेतातील एक महत्वाचा घटक आहे.

**गांडुळाचे प्रकार**

**१) एपिजिक-** ही गांडुळे जमिनीच्या पृष्ठभागालगतच राहतात. आपल्या अन्नापैकी ८० टक्के भाग सेंद्रिय पदार्थ खातात, तर २० टक्के भाग माती व इतर पदार्थ खातात. त्यांचा प्रजननाचा दर अधिक असतो. त्यांचा आकार लहान असतो.

कृषी विशेष




**२) ॲनेसिक**

ही गांडुळे साधारणत जमिनीत एक मीटर खोलीपर्यंत राहतात ते सेंद्रिय पदार्थ व माती खातात. त्यांचा आकार मध्यम असतो.

**३) एण्डोजिक**

ही गांडुळे जमिनीत तीन मीटर अथवा त्याहून अधिक खोलीपर्यंत राहतात. त्यांचा आकार लांब असतो, रंग फिक्कट असतो व प्रजननाचा दर अतिशय कमी असतो. ते बहुधा माती खातात.

या तीन प्रकारांची वैशिष्ट्ये व गुणधर्म पाहता एपिजिक व ॲनेसिक गांडुळे खत तयार करण्यासाठी वापरली जातात. त्यातही आईसेनिया फेटिडा, पेरिऑनिक्स, युड्रिलस व लॅम्पिटो या चार प्रजाती अधिक उपयुक्त आहेत. ते स्वतच्या वजना इतके अन्न रोज खातात.

**गांडूळ खतासाठी गांडुळाच्या योग्य जाती**

गांडूळांच्या ३०० हून अधिक जाती असल्या तरी प्रामुख्याने ईसिना फोइटीडा, युड्रीलस युजेनिया, पेरीनोक्सी, एक्झोव्हेटस, फेरीटीमा इलोंगेटा या गांडूळांच्या महत्वाच्या आणि योग्य जाती आहेत. या जातीची वाढ चांगली होऊन त्या खत तयार करण्याची प्रक्रिया ४० ते ४५ दिवसात होते.

# १९ दिवसांत ४१ डेंग्यू पॉझिटिव्ह

## स्वच्छता, आरोग्य यंत्रणेचे पितळ उघडे, फवारणीत अनियमितता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० अमरावती–** शहरात सप्टेंबर महिन्याच्या १९ दिवसांत ८७ संशयितांपैकी ४१ डेंग्यू पॉझिटिव्ह रुग्ण आढळले आहेत. मागील ८ महिने १९ दिवसांचा विचार करता शहरात १३८ पॉझिटिव्ह रुग्ण झाले आहेत. स्वच्छतेवर ४० कोटी रुपये मनपाद्वारे खर्च केले जात असताना अशी स्थिती असल्याने नागरिकांकडून रोष व्यक्त होत आहे.

धुवारणी, फवारणीत अनियमितता तसेच नियमितपणे स्वच्छताही होत नसल्याने स्वच्छता व आरोग्य यंत्रणेचे पितळ उघडले पडले आहे. शहरात आरोग्य विभागाद्वारे नागरिकांना कोरडा दिवस पाळण्यासह पाण्याची भांडी, फुलदाण्या, कुलरचे टब, छतावर पडलेले भांडे रिकामे करण्याचा तसेच पाण्याचे टाके स्वच्छ ठेवण्याचा सल्ला दिला जात आहे. परंतु, सातत्याने ही कामे करत असतानाही शहरात डेंग्यूचा प्रादुर्भाव वाढला आहे.पावसाळ्यानंतर




अशाप्रकारे साथरोगांसह डेंग्यूची लागण होत असते, असे आरोग्य विभागाचे मत आहे. जिल्ह्याचा विचार करता मागील ८ महिने १९ दिवसांत जिल्ह्यात १७०० संशयितांपैकी २८० डेंग्यू रुग्ण आढळले आहेत. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातच डेंग्यूच्या लाटेला आवर घालण्यासाठी आणखी परिश्रम घेण्याची आवश्यकता आहे. कारण, सध्या जनजागृतीसह उपाययोजना सुरू आहेत. यात ताप आलेल्यांच्या घरी आरोग्य पथकांच्या भेटी, रक्तजल नमुने गोळा करणे, पाण्यात गप्पी मासे सोडणे, पाण्याची भांडी रिकामी करणे, शक्य असेल तेथे पाण्यावर फवारणी करणे अशा उपाययोजना आरोग्य विभागाद्वारे केल्या जात आहेत.

# तरुणांनो तुम्ही दंगलीच्या भानगडीत पडू नका:राजकारण्यांचे कोणी यात अडकत नाही

## इंदूरीकर महाराजांनी टोचले कान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०अकोले–** तुम्ही गरीब राहा, वेळ पडली तर घरोघरी फिरून कुल्फी विका, आणखी काही व्यावसाय धंदा करा, पण दंगलींच्या भानगडीत पडू नका, असा सल्ला इंदूरीकर महाराजांनी नगर जिल्ह्याच्या अकोले येथे त्यांच्या किर्तनात दिला आहे. तसेच धर्माच्या नावाखाली गरीबांच्या पोरांचा बळी देऊ नका, धर्मांचं भांडवल करु नका, असे सांगत राजकारण्यांचेही कान टोचले आहेत.

इंदूरीकर महाराज म्हणाले, माझ्याएवढी किर्तने महाराष्ट्रात कोणी केली नसतील. महिन्यात ८० तरी किर्तने होतात. यातून आलेल्या अनुभवावरून सांगतो, तरुणांनो तुम्ही दंगलीच्या भानगडीत पडू नका. दंगलीत अडकला तर दहा वर्षे शिक्षा आहे. आतापर्यंत गरीबांचीच मुले दंगलीत अडकली आहेत. श्रीमंत आणि राजकारण्यांचे कोणी यात अडकत नाही. धर्माचा अभिमान नाही का? असे कुणी तुम्हाला विचारले तर त्याला सांगा तुमचा धर्म माईकवर आहे. आमचा धर्म आमच्या हृदयात आहे.

पुढे बोलताना इंदूरीकर महाराज म्हणाले, धर्माच्या नावाखाली आमच्या गरीबांच्या पोरांचा बळी देऊ नका. दंगलीत अडकवून आमच्या पोरांचे करिअर उध्वस्त करू नका, असे राजकारण्यांना सांगितले पाहिजे, असेही इंदुरीकर म्हणाले. तरुणांना सल्ला देताना ते म्हणाले, तुम्ही दंगलीत पडू नका. तुम्ही गरीब राहा, वेळ पडली तर घरोघरी फिरून कुल्फी विका, आणखी काही काम धंदा करा, या असल्या गोष्टींमध्ये पडू नका. ४० टक्के तरुण पुढार्यांच्या मागे फिरून भिकारी झाली आहेत.



राजकारण्यांवर निशाणा साधत इंदूरीकर महाराज म्हणाले, ज्यांनी आयुष्यभर पोरांचा वापर भोंगे बांधायला केला, ते नोकरी देऊ म्हणतात, पण देत नाहीत. केवळ वापरून सोडून देतात. इंदूरीकर महाराज त्यांच्या प्रवचानाच्या व किर्तनाच्या माध्यमातून समाजाला द्यानाचे सल्ले देतात. कधी कधी त्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे ते अनेकदा चर्चेतही राहतात.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २० सप्टेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# खा. बळवंत वानखडे, आ. यशोमती ठाकूरसह ४० जणांवर गुन्हे दाखल

## जमावबंदीचे उल्लंघन व विना परवानगी आंदोलन केल्याचा आरोप





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**

राहूल गांधी विरोधात बेताल वक्तत्व केल्यानंतर खा. बळवंत वानखडे, आमदार यशोमती ठाकूर यांनी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह सीपी रेड्डींच्या दालनात ठिय्या दिला होता. याबाबत बळवंत वानखडे, यशोमती ठाकूरसह काँग्रेसच्या ४० पदाधिकारी, कार्यकर्त्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

राहुल गांधीची जिभ छाटण्याची भाषा योग्य नाही. पण, त्यांनी संविधानाविरोधात केलेल्या चुकीच्या भाष्याबद्दल त्यांच्या जिभेला चटके द्यायला हवे, असे स्टेटमेन्ट खा. बोंडेंनीऑनकॅमेरा केल्याने आधी यशोमती ठाकूर विरूध्द अनिल बोंडे असा सामना रंगला होता. नंतर हा वाद भाजप विरूध्द काँग्रेस असा झालाबोंडे वारंवार दंगा भडकविण्याच्या उद्देश्याने भाष्य करतात. तरी देखील पोलिस त्यांच्यावर सुमोटे ॲक्शन घेत नाही, असा रोष व्यक्त करून आ. यशोमती ठाकूर ह्या १८ सप्टेंबरला खा. बळवंत वानखडे, माजी आमदार सुनील देशमुख, प्रा. विरेंन्द्र जगताप, काँग्रेसचेजिल्हाध्यक्ष बबलू देशमुख, शहर अध्यक्ष बबलू शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, मिलिंद चिमोटे, अनिकेत देशमुख, हरीभाऊ मोहोड,प्रवीण मनोहरे, नितिन गोंडाणे, हेमंत चिमोटे,रवींद्रशिंदे, सागर कलाने, आकाशखडसे, सागर व्यास, संजय मोरे, संजय आठवले, निलेश गुन्हेसह आदि अनेकांसह सीपींच्या दालनात प्रवेश केला आणि बोंडेंवर गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्याच्या मागणी केली.

जो पर्यंत बोंडेंना अटक होत नाहीतो पर्यंत दालनातून हटणार नाही, असा पवित्रा यशोमतींनी घेतल्यानंतर सीपींच्या दालनात चांगलेच वातावरण तापले होते. पोलिसांनी बोंडेंवर गुन्हे दाखल केल्यानंतर काँग्रेसने सीपींच्या दालनातील ठिय्या मागे घेतला. त्यानंतर शहर पोलिसांनी फिर्याद देऊन खा.बळवंत वानखडे, आ.यशोमती ठाकूरसह वरील नमूद काँग्रेसचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांविरोधात जमावबंदीचे उल्लघंन व विना परवानगीने आंदोलन केल्याचे फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल केले आहे.

## अमरावती आगाराचे सकाळचे वेळापत्रक कोलमडले

# भोपाळ,जालना,पंढरपूर सह अनेक लांब पल्ल्याच्या बसेस रद्द



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज शुक्रवार (दि. २०) वर्धेत येणार आहेत. त्यांच्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर एसटी महामंडळाच्या अमरावती जिल्ह्यातून ३२० पैकी तब्बल १७० बस वर्धेत पाठवल्या आहेत. त्यामुळे केवळ १५० बस नियमित प्रवाशांसाठी गुरुवारी जिल्ह्यात उपलब्ध होत्या. बसची संख्या कमी असल्यामुळे अनेक प्रवाशांची गैरसोय झाली आहे. हीच परिस्थिती शुक्रवारी राहणार असून, शुक्रवारी सायंकाळी यां बस अमरावतीत परत येतील.

अमरावती जिल्ह्यातून गुरुवारी सकाळी ११० तर सायंकाळी ६० अशा एकूण१७० बस गेल्या आहेत. बसची संख्या कमी असल्यामुळे अनेक मार्गावर बस गेलीच नाही. काही मार्गावर दोन फेऱ्यांऐवजी एक फेरी केली – आहे. अपुऱ्या बसचा फटका विद्याथ्यर्थ्यांनाही बसला आहे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी शाळा, महाविद्यालयात तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी येतात.. दरम्यान गुरुवारी दुपारी बस कमी असल्यामुळे मध्यवर्ती बसस्थानकात अनेक प्रवाशी खोळंबले होते. सायंकाळी ५ वाजता बसस्थानकात प्रवाशांची चिक्कार गर्दी होती.

आज सकाळच्या अनेक बस फेऱ्या रद्द

अमरावती मध्यवर्ती बस स्थानकातून दररोज सकाळी लांब पल्ल्याच्या बसेस रवाना होतात त्यात जालना,भोपाळ,पंढरपूर ,संभाजीनगर,बेतूल,खंडवा या बसेस आहेत मात्र या सर्व बस फेऱ्या आज रद्द करण्यात आल्या आहेत त्यामुळे प्रवाश्याना नाहक त्रास सहन करावा लागत आहे वर्धे मध्ये मोदींच्या सभेकरिता बसेस गेल्याने अमरावती बस आगाराचे सकाळचे वेळापत्रक पूर्णपणे कोलमडले आहे

# मोकाट कुत्र्यांनी गोठ्यामधील शेळ्यांची ११ पिल्ले केली फस्त

## मोझरीतील घटना नागरिकांत कुत्र्यांची दहशत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०गुरुकुंज मोझरी –** गुरुकुंज मोझरी परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोकाट कुत्र्यांचा वावर वाढत असून, या कुत्र्यांनी एका शेतकऱ्याच्या गोठ्यातील शेळीच्या पिल्लांना लक्ष्य करत त्यांच्यावर हल्ला करून एकूण ११ पिल्लांचा फडशा पाडला. ही घटना बुधवारी (दि. १८) दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली आहे. या घटनेत पशुपालक मारोतराव राऊत यांचे जवळपास ५० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. मोझरी येथील मोलमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे मारोतराव राऊत यांचा घरालगतच काही अंतरावर शेळ्यांचा गोठा आहे. नेहमीप्रमाणे बुधवारी ते शेळ्या शेतात चराई करण्यासाठी घेऊन गेले होते. त्या वेळी त्यांनी गोठ्यात शेळीची पिल्ले बांधून ठेवली होती. दुपारच्या सुमारास परिसरात अथवा गोठ्यात कुणीच नसल्याची संधी साधून गावातील भटक्या व मोकाट कुत्र्यांनी या शेळीच्या पिल्लावर हल्ला चढवत एकूण ११ पिल्लयांना फस्त केले. दरम्यान मारोतराव राऊत हे सायंकाळच्या सुमारास गोठ्यात गेले असता त्यांना शेळ्यांची पिल्ले मृतावस्थेत दिसली. घटनेची माहिती मिळताच मोझरी येथील सरपंच सुरेंद्र भिवगडे, उपसरपंच प्रशांत प्रधान, जसबीर ठाकूर यांनी घटनास्थळी भेट दिली. यासंदर्भात दूरध्वनीवरून पशू वैद्यकीय अधिकारी तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांना घटनेची माहिती देण्यात आली. दरम्यान या घटनेने मोझरी येथील परिसरात मोकाट कुत्र्याची मोठी दहशत पसरली असून ग्रामस्थांच्या चिंतेत वाढ झाली आहे.

मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करा : मोझरी येथील परिसरात सर्वत्र भटक्या व मोकाट कुत्र्यांनी चांगलाच उच्छाद मांडला असून, त्यांची दहशत निर्माण झाली आहे. त्यामुळे गावातील मोकाट व भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी येथील ग्रामस्थांद्वारे करण्यात येत आहे.

# भाजप खासदार अनिल बोंडे म्हणतात राहुल गांधी काय म्हणाले ते देखील आधी सांगा

## राज्यातील काँग्रेसच्या आंदोलना आधीच भाजप खासदार अनिल बोंडे यांचे आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती –** काँग्रेसला माझ्या विरोधात आंदोलन करायचे असेल तर त्यावर मला काहीही म्हणायचे नाही. मात्र, आंदोलन करण्याआधी राहुल गांधी काय म्हणाले होते, ते देखील जनतेला सांगावे, असे आव्हान खासदार अनिल बोंडे यांनी दिले आहे. राहुल गांधी यांच्या जिभेला चटके द्यायला हवे, अनिल बोंडे यांनी असे वादग्रस्त वक्तव्य केले होते. यावर आता काँग्रेसच्या वतीने त्यांच्या विरोधात राज्यभर आंदोलन करण्यात येत आहे. यावर अनिल बोंडे यांनी देखील पलटवार केला आहे.



माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी देखील आरक्षण संपवण्याची भाषा केली होती. भारतामध्ये निवडणुकीच्या काळामध्ये आम्ही आरक्षणाची मर्यादा वाढवणार, जातीनिहाय जनगणना करणार, असा दावा राहुल गांधी यांनी केला होता. एकिकडे आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचा दावा करायचा आणि दुसरीकडे अमेरिकेममध्ये जात आरक्षण संपवण्याची भाषा ते करत आहे. असा आरोप देखील बोंडे यांनी केला आहे. काँग्रेसने माझ्याविरुद्ध आंदोलन निश्चित करावे त्यांच्या आंदोलनावर मला काही म्हणायचे नाही. मात्र, राहुल गांधी आरक्षणावर काय म्हणाले होते, हे देखील जनतेचा सांगावे, असे आवाहन देखील खासदार बोंडे यांनी दिले आहे.

आरक्षणाच्या मुद्यावर वादग्रस्त विधान करणाऱ्या काँग्रेस नेते राहुल गांधी यांची जीभ छाटू नका, तिला केवळ चटके द्या, असे वादग्रस्त विधान भाजप खासदार अनिल बोंडे यांनी केले होते. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या आमदारानंतर भाजप खासदार बोंडे यांनी असे विधान केल्यामुळे राज्याचे राजकारण चांगलेच तापले आहे.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आपल्या अमेरिका दौऱ्यात आरक्षणाच्या मुद्यावर कथित वादग्रस्त विधान केले होते. देशात सर्वांना समान संधी मिळू लागतील, तेव्हा काँग्रेस आरक्षण संपुष्टात आणण्याच्या मुद्यावर विचार करेन. पण सध्या भारतात अशी कोणतीही परिस्थिती नाही, असे ते म्हणाले होते. त्यांच्या या विधानानंतर सत्ताधारी शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी त्यांची जीभ छाटणाऱ्यास ११ लाख रुपयांचे बक्षीस देण्याची घोषणा केली होती. त्यानंतर आता भाजप खासदार अनिल बोंडे यांनी राहुल गांधी यांच्या जिभेला चटके देण्याची मागणी केली होती.

# खासदार अनिल बोंडे यांच्या जिभेला डागण्या देण्याची वेळ

## तिवसा तालुका महिला काँग्रेस आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० तिवसा –**भाजपाचे खासदार अनिल बोंडे यांच्या जिभेला आता डागण्या देण्याची वेळ आली आहे. तिवसा विधानसभा मतदार संघामध्ये एक महिला अत्यंत धडाडीने काम करते आहे, हे पाहवत नसल्याने अनिल बोंडे यांच्याकडून आमदार ड.यशोमती ठाकूर यांची बदनामी केली जात आहे. अशा नेत्याला आता आम्ही सोडणार नाही असे म्हणत महिला काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी जोरदार आंदोलन केले.भारतीय जनता पक्षाचे राज्यसभेचे खासदार अनिल बोंडे यांच्या बेताल वक्तव्याचा निषेध करीत तिवसा तालुका महिला काँग्रेसच्या वतीने आज तिवसा येथे भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. खासदार बोंडे हे नेहमीच अत्यंत भडकाऊ वक्तव्य करत असतात. त्यांच्या जिभेला लगाम नाही. राहुल गांधी यांच्या विषयी आणि आमदार यशोमती ठाकूर यांच्या विषयी ज्या पद्धतीने ते बेताल वक्तव्य करत आहे ते पाहता त्यांना धडा शिकवण्याची आणि प्रसंगी जिभेला डागण्यात येण्याची ही वेळ आहे, अशा भावना महिला कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या. जिल्ह्यामध्ये काँग्रेसच्या वतीने अनेक विकास कामे केली जात आहेत. तिवसा मतदारसंघांमध्ये आमदार ड. यशोमती ठाकूर यांनी केलेला कामाचा धडा आणि त्यांना मिळणारा जनतेचा प्रतिसाद पाहून बोंडे यांच्या पोटात दुखत आहे. मात्र त्यांच्या या निंदनीय वक्तव्याचा आपण तीव्र शब्दात निषेध करतो जनता त्यांना आता धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असेही यावेळी महिला कार्यकर्त्यांनी आपल्या भावना बोलून दाखवल्या.



यावेळी रुपाली काळे, कल्पना दिवे, रोशनी पुनसे, प्रिया विघ्ने, संगीता राऊत, अर्चना राऊत, अर्चना भोबे, उषा चौधरी, सावित्री वाघमारे, सविता धानोरकर, जयश्री आबूलकर, आशाताई प्रधान, कल्पना अग्रवाल, सोनूताई आमले, कल्पना राजूरकर, संगीता ढोले, छाया कडू, मंदा शेंडे, स्वेता गावंडे, कल्पना गावंडे, शहीदबी शहा, मालता गडलिंग, शारदा अधम, कल्पना खडसे, चंदा मनवर,छाया आसोडे, रंजना कोल्हे, सुमन शापामोहन, सुनीता चौधरी, बारके ताई, अमृता चौधरी अन्नपूर्ण चौधरी, सुषमा पावडे, सीमाताई कठाणे इत्यादी महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

# समाजाची घडी नीट करण्यासाठी वारकरी संप्रदायाची शिकवण गरजेची

## रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांचे सोहळ्यात प्रतिपादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अकोला –** विस्कटलेली घडी नीट करण्यासाठी आज वारकरी संप्रदायाच्या शिकवणीची समाजाला खरी गरज आहे. ही शिकवण रस्त्यात पडलेला दगड बाजूला ठेवायला सांगते. दगड मारायला नव्हे! अशा शिकवणीच्या सेवाकार्यामुळेच आपणास राज्य शासनाचा ज्ञानोबा-तुकोबा हा पुरस्कार लाभला असून या पुरस्कारामुळे सेवाकार्याची जबाबदारी वाढली आहे. हा पुरस्कार खऱ्या अर्थाने वारकऱ्यांचा असल्याचे मत सत्कारमूर्ती, ज्येष्ठ रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांनी व्यक्त केले.

आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्पाच्या वतीने प्रमिलाताई ओक सभागृहात संजय महाराज पाचपोर यांचा गौरव सोहळा संपन्न झाला. यावेळी पाचपोर महाराज आपल्या सत्काराला उत्तर देत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विदर्भ प्रांत सहसंघचालक नागपूर येथील श्रीधर गाडगे अध्यक्ष, तर प्रमुख पाहुणे जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे वंशज शिवाजी महाराज मोरे उपस्थित होते.



संजय महाराज पाचपोर पुढे म्हणाले, वारकरी संप्रदाय हा बहुआयामी संप्रदाय आहे. गाथा, ज्ञानेश्वरी व भगवंताच्या अधिष्ठानावर हा संप्रदाय रचला आहे. या अनुषंगाने संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम व छत्रपती शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने राज्यातील पहिले पुरोगामी असल्याचे पाचपोर महाराज यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुभाष जैन, माजी अध्यक्ष रतनलाल खंडेलवाल, रमेशचंद्र चांडक, ॲड. मोतीसिंह मोहता, किशोर पाटील, सोनू देशमुख आदींच्या उपस्थितीत सत्कारमूर्ती संजय महाराज पाचपोर यांचा शाल श्रीफळ, मानपत्र व चांदीची गोमाता प्रदान करून भावपूर्ण गौरव करण्यात आला.

अध्यक्षीय मनोगतात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत सहसंघचालक श्रीधर गाडगे यांनी वारकरी संप्रदाय हा रसाळ वाणीचा संप्रदाय असल्याचे सांगितले. दरम्यान सत्कारमूर्ती संजय महाराज यांच्या अनेक संस्था, सेवा, संघटनांनी सत्कार केला. मानपत्र वाचन प्रशांत महाराज ताकोते, संचालन प्रा. विवेक बिडवई यांनी केले. यावेळी आ. रणधीर सावरकर, विजय अग्रवाल, गोपाल खंडेलवाल, रामेश्वर पुंडकर, सदानंद महाराज, तायडे महाराज, संतोष पिसे, मेहत्रे, डॉ. प्रवीण चौहान, प्रकाश लोढिया, कृष्णा शर्मा, रामभाऊ भिरड समवेत विविध गावावरून आलेले हभप, महिला पुरुष नागरिक व आदर्श गोसेवा व अनुसंधान प्रकल्पाचे समस्त विश्वस्त उपस्थित होते.

संतांमुळे वैचारिक चळवळ : शिवाजी महाराज मोरे संत तुकाराम महाराज यांचे वंशज शिवाजी महाराज मोरे यांनी मनोगत व्यक्त करत संतांमुळे राज्यात वैचारिक चळवळ सुरू झाली असल्याचे सांगितले. गोसेवा ही श्रेष्ठ सेवा असून या गोसेवेच्या माध्यमातून पाचपोर महाराज यांचे सेवा कार्य सातत्याने सुरू असून देशात वाढत चाललेली गोहत्या बंद व्हावी अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# शहापूर येथे बस-आयशरचा भीषण अपघात, ६ ठार

## जालना वडिगोद्री राष्ट्रीय महामार्गावर घटना



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०बीड** – राष्ट्रीय महामार्ग ७५३ जालना वडिगोद्री राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात झाला. ही घटना सकाळी ८ च्या दरम्यान घडली. हा अपघात एवढा भीषण होता की, जाहीच सहाजण ठार झाले आहेत. अनेकजण गंभीर जखमी झाली आहेत. जखमींची संख्या व मृतांची नावे अद्याप स्पष्ट झालेली नाहीत.

माहितीनुसार सकाळी आठच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग ७५३ जालना वडिगोद्री राष्ट्रीय महामार्गावर बस व आयशरचा भीषण अपघात झाला. बस एम एच २० बि एल ३५५३ अंबाजोगाई येथुन संभाजी नगरच्या दिशेने जात होती. तर, आयशर क्रमांक एमएच ०१ सी आर ८०९९ अंबड कडून बीडकडे संत्रा घेऊन जात होता. दरम्यान शहापूर ते मठ तांडा या भागात बस व आयशरचा समोरासमोर जोरदार धडक होऊन भिषण अपघात झाला. हा अपघात एवढा भीषण होता कि बस व आयशरचा समोरील भागाचा अक्षरशः चुराडा झाला आहे. तर सहाजण जागीच ठार झाले आहेत.

मृतांची ओळख व जखमींचा आकडा स्पष्ट नाही

या भीषण अपघातात बसमधील सहा प्रवाशी ठार झाल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे. तर अनेक प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. यामध्ये अद्याप मृतांची नावे व जखमींचा आकडा स्पष्ट झालेला नाही. मठ तांडा व शहापूर येथील ग्रामस्थांनी बसमधील अडकलेल्या प्रवाशांना बाहेर काढून अंबड येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले आहे. हा अपघात एवढा भिषण होता कि बस मध्ये प्रवाशांच्या रक्ताचा खच साचला आहे. या आपघतामुळे राष्ट्रीय महामार्ग ७५३ वरती वाहनांच्या दुतर्फा लांबच लांब रांगा होत्या. घटनास्थळी गोंदी व अंबड पोलिसांनी धाव घेत वाहतुक सुरळीत केली आहे.

# ४१ दिवसांनंतर डॉक्टरांचा संप अखेर मागे शनिवारपासून आपत्कालीन सेवा सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० मुंबई–** कोलकाता येथील आरजी कार मेडिकल कॉलेजमधील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेल्या बलात्कार आणि हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ डॉक्टरांनी संप सुरु केला होता. दरम्यान, तब्बल ४१ दिवसांनतर सुरू असलेला संप मागे घेत असल्याची घोषणा ज्युनियर डॉक्टरांनी केली आहे. ते २१ सप्टेंबरपासून हॉस्पिटलमध्ये अत्यावश्यक सेवा पुन्हा सुरू करणार आहेत. मात्र, ओपीडी सेवा काही काळासाठी बंद राहणार आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार टप्प्याटप्प्याने संप मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शनिवारपासून डॉक्टर आपत्कालीन सेवा देण्यास सुरुवात करतील. ते सध्या आउटडोअर आणि इनडोअर सेवांमध्ये सहभागी होणार नाहीत. या आंदोलनाला पाठिंबा देत गुरुवारी (दि.१९) राज्यातील वरिष्ठ डॉक्टरांनीही कनिष्ठ डॉक्टरांना संप मागे घेण्याचे आवाहन केले होते.

९ ऑगस्ट रोजी ३१ वर्षीय पदव्युत्तर प्रशिक्षणार्थी डॉक्टरचा मृतदेह अर्धनग्न अवस्थेत सरकारी आरजी कार मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या सेमिनार हॉलमध्ये आढळून आला होता. या प्रकरणी कोलकाता पोलिसांचा नागरी स्वयंसेवक संजय रॉय याला दुसऱ्या दिवशी अटक करण्यात आली होती. या घटनेनंतर पश्चिम बंगालसह देशभरात डॉक्टरांनी निदर्शने केली. सुप्रीम कोर्टाच्या हस्तक्षेपानंतर दिल्लीसह देशातील इतर भागातील आंदोलनकर्ते डॉक्टर कामावर परतले, मात्र पश्चिम बंगालमधील ज्युनियर डॉक्टरांनी आंदोलन कायम ठेवले.

'न्यायासाठी आमचा लढा संपलेला नाही'

संप संपल्याची घोषणा करताना आंदोलक डॉक्टरांनी सांगितले की, आमचा न्यायासाठीचा लढा अद्याप संपलेला नाही. ते पुढे म्हणाले की, शनिवारपासून पश्चिम बंगालच्या सरकारी रुग्णालयांमध्ये आपत्कालीन आणि अत्यावश्यक सेवा अंशतः पूर्ववत केल्या जातील. बंगालमधील पूरग्रस्तांना वैद्यकीय मदत देण्यासाठी आवश्यक पावले उचलली जातील. आंदोलक डॉक्टरांनी शनिवारपासून 'काम बंद' मोहीम अंशत: मागे घेणार असल्याचे सांगितले. त्यांनी सांगितले की, शुक्रवारी आरोग्य भवनाबाहेरील आंदोलन मागे घेतले जाईल. पश्चिम बंगाल सरकारच्या सर्व आश्वासनांची अंमलबजावणी करण्यासाठी आठवडाभर वाट पाहणार असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. आश्वासनांची पूर्तता न झाल्यास पुन्हा काम बंद पाडू.

### सरकारने डॉक्टरांच्या बहुतांश मागण्या केल्या मान्य

पश्चिम बंगाल सरकारने डॉक्टरांनी मांडलेल्या बहुतांश मागण्या मान्य केल्या आहेत. यानंतर आंदोलक ज्युनिअर डॉक्टरांनी शनिवारपासून आपले आंदोलन अंशत: संपवून सरकारी रुग्णालयांना सेवा देण्याचे जाहीर केले आहे. महिला डॉक्टरवर बलात्कार आणि हत्येच्या घटनेनंतर डॉक्टरांनी गेल्या ४१ दिवसांपासून कामबंद आंदोलन केले. आंदोलन संपवण्यापूर्वी ते राज्य आरोग्य विभागाच्या मुख्यालय स्वास्थ्य भवन ते सॉल्ट लेक परिसरातील सीजीओ कॉम्प्लेक्स येथील सीबीआय कार्यालयापर्यंत मोर्चा काढतील. एका आंदोलक डॉक्टराने त्यांच्या सर्वसाधारण सभेनंतर सांगितले की, 'पश्चिम बंगालमधील पूरस्थिती लक्षात घेता आणि राज्य सरकारने आमच्या काही मागण्या मान्य केल्याने आम्ही शनिवारपासून आपत्कालीन सेवा सुरु करत असल्याचे म्हटले आहे.

# राज्यात 'परिवर्तन महाशक्ती' तिसरी आघाडी

## राजू शेट्टी, संभाजीराजे, बच्चू कडू यांचा पुढाकार; २६ सप्टेंबरला मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० पुणे :**

विधानसभेच्या पार्श्वभूमीवर राज्यात 'परिवर्तन महाशक्ती' नावाने तिसरी आघाडी आकाराला येत आहे. त्यासाठी पुण्यात गुरुवारी स्वाभिमानी पक्षाचे अध्यक्ष राजू शेट्टी, स्वराज्य पक्षाचे प्रमुख युवराज संभाजीराजे, प्रहार जनशक्ती पक्षाचे आ. बच्चू कडू, महाराष्ट्र राष्ट्र समितीचे शंकरअण्णा धोंडगे, स्वतंत्र भारत पक्षाचे वामनराव चटप, नारायण



अंकुशे यांच्या उपस्थितीत बैठक झाली. त्यानंतर या नेत्यांनी 'परिवर्तन महाशक्ती' या आघाडीची घोषणा केली.महाशक्तीचा एकत्रित मेळावा येत्या २६ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होईल, असे चटप यांनी सांगितले.

शेट्टी म्हणाले, तिसरी आघाडी ही एक सक्षम पर्याय म्हणून असेल.

युवराज संभाजीराजे म्हणाले, पूर्वी मोठ्या गावांना बुद्रुक व छोट्या गावांना खुर्द म्हटले जायचे, तशीच अवस्था शिवसेना व राष्ट्रवादीची झाली आहे.

### ..तर निवडणूक लढवणार : बच्चू कडू

'मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून १८ मागण्यांचा प्रस्ताव दिला असून, त्यावर अजून उत्तर आलेले नाही. २५ तारखेपर्यंत वाट पाहू. त्यांचे उत्तर न आल्यास तिसरी आघाडी म्हणून निवडणूक लढवू. आघाडीच्या चिन्हाबाबत लवकरच कळवू,' असे बच्चू कडू म्हणाले. या वेळी 'महायुती सोडली का?' या प्रश्नावर कडू यांनी, 'मी महायुतीबाहेर पडलो आहे, हे स्टॅम्प पेपरवर लिहून देऊ का?' असा प्रतिप्रश्न केला.

# ॲड. गुणरत्न सदावर्तेंच्या एसटी बँकेच्या सभेत तुफान राडा!

## पोलिसांवर फेकल्या खुर्च्या, धक्काबुक्की

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०भंडारा : –** भंडारा येथील ड. गुणरत्न सदावर्ते यांच्या पॅनेलकडून बोलावण्यात आलेली एसटी ट्रान्सपोर्ट बँकेची सभा आज वादळी ठरली. मोठ्या गदारोळानंतर एसटी ट्रान्सपोर्ट बँकेची सभा संपवण्यात आली. यावेळी पोलिसांवर खुर्च्या फेकण्यात आल्या. एकमेकांना धक्काबुक्की करण्यात आली. सदावर्तेंवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा विरोधकांनी ठराव आणला. तर मारहाण केल्याप्रकरणी सदावर्तेंच्या समर्थकांनी भंडारा पोलिसांत तक्रार दिली.एसटी महामंडळ कर्मचाऱ्यांच्या एसटी ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह बँकेची सर्वसाधारण ७१ वी सभा भंडाऱ्यात आयोजित करण्यात आली होती. ड. गुणरत्न सदावर्ते यांच्या पॅनलकडून ही सभा आयोजित करण्यात आली होती. मात्र, एसटी कामगार कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी ही सभा अक्षरशः उधळून लावली. वार्षिक विशेषांकावर सत्ताधाऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, प्रभू श्री रामचंद्र यांच्यासह नथुराम गोडसे यांचे छायाचित्र लावल्याचा मुद्दा धरत आर्थिक घोटाळा केल्याप्रकरणी सत्ताधाऱ्यांना धारेवर धरले. यावेळी वाद वाढला आणि विरोधकांनी अक्षरशः अहवालाची पुस्तकं फाडून फेकली.



**तक्रार दाखल–** गुणरत्न सदावर्ते यांच्या सत्ताधारी पदाधिकाऱ्यांनी खुर्च्या फेकून मारल्या प्रकरणी विरोधकांच्या विरोधात भंडारा पोलिसांत तक्रार दाखल केली. तर दुसरीकडे विरोधकांनी गुणरत्न सदावर्ते यांनी एसटी कर्मचारी सोडून बाहेरचे सभासद बनवले, बँकेत ३५ लाखांचा अपहार केला असा आरोप विरोधी एसटी कामगार कृती समितीने केला.

### तोडफोड, फेकाफेकी

वाद वाढल्यानंतर एकमेकांना धक्काबुकी करत खुर्च्यांची तोडफोड करून फेकाफेकी केली. यातील काही खुर्च्या पोलिसांनाही फेकून मारण्यात आल्या. एसटी कामगार कृती समितीनं सभेतून बाहेर पडत लगतच्या दुसऱ्या सभागृहात वार्षिक सभा आटोपली. तर, पदाधिकाऱ्यांनी ही सभा तहकूब केल्याचे घोषित केले.

## बाळासाहेब थोरात म्हणतात...

# महाविकास आघाडीचा काँग्रेसचा मुख्यमंत्री होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० मुंबई** – राज्यात विधानसभेची निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्यामुळे घडामोडींना वेग आला आहे. सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार तयारी सुरु केली आहे. राज्यभरात वेगवेगळ्या मतदारसंघात महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांच्या सभा, मेळावे आणि आढावा बैठका सुरु आहेत. या सभांच्या माध्यमातून एकप्रकारे निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात केल्याचं चित्र दिसून येत आहे. अनेक नेत्यांचे राज्यभरात दौरै सुरु आहेत. या दौऱ्यांच्या माध्यमातून आगामी निवडणुकीची रणनीती आखली जात आहे. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती असा मुख्य सामना रंगण्याची चिन्ह आहेत. मात्र, असं असलं तरी महाविकास आघाडीमध्ये मुख्यमंत्रिपदावरून उलटसुलट चर्चा सुरु आहेत.



विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्याची मागणी शिवसेना ठाकरे गटाने अनेकदा केली आहे. मात्र, याबाबत अद्याप महाविकास आघाडीतील नेत्यांनी काहीही निर्णय घेतलेला नाही. काही दिवसांपूर्वी मुंबईत षण्मुखानंद सभागृहात महाविकास आघाडीचा मेळावा पार पडला होता. त्या मेळाव्यात बोलताना उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला आणि काँग्रेसला आवाहन करत मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करा, मी पाठींबा देतो, असं म्हटलं होतं. दरम्यान, यानंतर आता काँग्रेसचे नेते, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी मुख्यमंत्रिपदाबाबत मोठं विधान केलं आहे. महाविकास आघाडीचा काँग्रेसचा मुख्यमंत्री होईल, असं बाळासाहेब थोरात यांनी म्हटलं आहे. त्यांच्या या विधानामुळे महाविकास आघाडीत चर्चांना उधाण आलं आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतात, 'लाडकी बहीण कायम ठेवायची असेल तर युतीला निवडून द्या'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२०बुलढाणा–** आम्ही लाडकी बहीण योजना जाहीर केली तेंव्हा विरोधकांनी त्याची खिल्ली उडविली. आताही विरोधक त्यात अडचणी आणण्याचे आटोकाट प्रयत्न करीत आहे. यामुळे लाडक्या बहिणींनी घाबरून जायचे काम नाही. मात्र, योजना पुढेही सुरूच ठेवायची असेल तर, येणाऱ्या निवडणुकीत महायुतीला निवडून द्या, असे स्पष्ट आवाहन उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी येथे केले.

बुलढाणा येथे गुरुवारी, १९ सप्टेंबर रोजी संध्याकाळी लाडकी बहिण सन्मान सोहळा पार पडला. बुलढाणा चिखली राज्य महामार्गावरील शारदा ज्ञानपीठच्या प्रांगणावर आयोजित या कार्यक्रमाला हजारो लाडक्या बहिणींची तोबा गर्दी उसळली होती.



यावेळी बोलताना अजितदादांनी मित्र पक्षातील 'त्या' नेत्यांना दोन खडे बोल सुनावत अक्षरशः कान टोचले. महायुतीतील वाचाळविरांना आवरण्याची वेळ आली आहे. महाराष्ट्र हा शिव शाहू फुले आंबेडकरांचा आहे, यशवंतराव चव्हाण सारख्या सुसंस्कृत नेत्यांचे राज्य आहे. याचे भान ठेवून नेत्यांनी भान ठेवून बोलावे, आपल्या (वक्तव्या) मुळे महायुती आणि सरकार अडचणीत येणार नाही याची काळजी घ्यावी, असा वडीलकीचा सल्ला त्यांनी दिला.कुणी काहीही बोलले तर त्याला युतीचे समर्थन आहे असा परखड सल्ला देत त्यांनी कार्यक्रमाचा नूरच बदलून टाकला. आमदार संजय गायकवाड यांनी बुलढाणा शहरात उभारलेल्या महापुरुषांच्या पुतळ्यांचे भरभरून कौतुक केले. इतके पुतळे महाराष्ट्र राज्यात कुठेच नसतील असे सांगून या पुतळे आणि स्मारक मुळे बुलढाण्याच्या वैभवात भर पडल्याचे त्यांनी सांगितले. या पुतळ्यांचं काळजीपूर्वक जतन करा असा सल्ला त्यांनी यावेळी दिला.

# वादग्रस्त वक्तव्य टाळा, फडणवीस यांचा नितेश राणेंना सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२० नागपूर –** नागपूर : भाजप आमदार नितेश राणे हिंदुत्ववादी आहेत.. त्यांच्या वक्तव्याचा कधी कधी वेगळा अर्थ निघतो, नारायण राणे आणि मी त्यांच्याशी चर्चा केली केली असून त्यांना वादग्रस्त वक्तव्य टाळण्याचा सल्ला दिला आहे, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपुरात आले असता ते प्रसार माध्यमांशी बोलत होते. गेल्या काही दिवसांपासून नितेश राणे यांच्या विशिष्ट धर्माच्या विरोधी वक्तव्यामुळे चर्चेत आहे. विविध संघटनांनी राणे यांचा निषेधही केला आहे. बुलढाणाच्या कार्यक्रमात राष्ट्रवादीचे काँग्रेसचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही राणे यांचे याबाबत कान टोचले. यासंदर्भात फडणवीस यांना विचारले असता, ते म्हणाले, नितेश राणे यांच्याशी त्याचेवडील नारायण राणे आणि मी सुद्धा बोललेलो आहे. त्यांना असे वक्तव्य टाळण्याचा सल्ला दिला आहे. यापुढे ते काळजी घेतील.



विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी अभ्यास करून बोलले पाहिजे. उद्योग बाहेर गेला नाही, असा त्या कंपनीनेच खुलासा केला आहे. त्यामुळे ते तोंडावर पडले आहे. बातमी आली म्हणून लगेच माहिती न घेता महाराष्ट्राची बदनामी करायची, हे आता त्यांनी बंद केले पाहिजे. कुठलीही माहिती न घेता , केवळ वर्तमान पत्राच्या बातमीवर वक्तव्य करणे योग्य नाही असा सल्ला वडेट्टीवार यांनी दिला.

# महामहीम राज्यपालांचे स्वागत......



मेघालय राज्याचे महामाहीम राज्यपाल सी.एच.विजयाशंकर गुरुवारी अमरावती येथे आले असता त्यांनी संतोष महात्मे यांच्या घरी भेट दिली यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या श्रीमती सुरेखाताई ठाकरे,राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे,राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे विदर्भ अध्यक्ष निखिल ठाकरे यांनी त्यांचे स्वागत केले.

## काँग्रेसचा आत्मविश्वास वाढला म्हणून ते काही एकटे लढणार नाहीत : संजय राऊत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० मुंबई**

लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष म्हणून पुढे आला आहे. त्यानंतर महाराष्ट्रातील काँग्रेसच्या नेत्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. परिणामी महाविकास आघाडीत विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या जागावाटपात काँग्रेसने अधिक जागांची मागणी केली असल्याचं बोललं जात आहे. तसेच काही काँग्रेस नेते मुख्यमंत्रीपद काँग्रेसला मिळावं अशी इच्छा व्यक्त करत आहेत.



या सर्व घटना पाहता काँग्रेसचा आत्मविश्वास वाढला आहे, असं म्हटलं जात आहे. यावरून प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी शिवसेनेच्या ठाकरे गटाचे राज्यसभेचे खासदार संजय राऊत यांना प्रश्न विचारला. त्यावर संजय राऊत म्हणाले, केवळ काँग्रेसचाच नव्हे तर संपूर्ण महाविकास आघाडीचाच आत्मविश्वास वाढलेला आहे.

संजय राऊत म्हणाले, लोकसभा निवडणुकीनंतर आमचा सर्वांचाच आत्मविश्वास वाढला आहे. मात्र आता विधानसभा निवडणूक आहे. या निवडणुकीत आत्मविश्वास मिळावा यासाठी एकत्र काम करावे लागेल. तिन्ही पक्षांना एकत्र राहावं लागेल आणि काँग्रेसचा आत्मविश्वास वाढला म्हणून ते काही एकटे लढणार नाहीत. तीन पक्ष एकत्र आल्याशिवाय ते शक्य होणार नाही. महाविकास आघाडी घट्ट झाल्याशिवाय आत्मविश्वास कसा वाढेल? आत्मविश्वास वाढला आहे असं कोणाला वाटत असेल तर तो आत्मविश्वास कोणाचा आहे? कशामुळे आहे? कसा आहे? हा अभ्यासाचा विषय असल्याचे राऊत म्हणालेत.

## भातकुली पोलिसांनी राखला वर्दीचा मान

### पोलीस स्टेशन मधल्या गणपती बाप्पा विसर्जनासाठी घातला विशेष ड्रेस कोड

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०भातकुली**

संपुर्ण महाराष्ट्र सह अमरावती जिल्ह्यातही गणपती उत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला भातकुली पोलिस स्टेशन मध्ये हि दरवर्षीप्रमाणेच या वर्षी सुद्धा बाप्पास्थापना करण्यात अली होती दररोज बाप्पाची नियमितपणे आरती केली जात असे गुरुवार दिनांक १९ सप्टेंबर



रोजी पोलिस स्टेशन भातकूली येथील बाप्पाचे ढोल ताशे व फुलांचा वर्षाव करून तसेच बाप्पाचे विसर्जन करण्यात आले मात्र या विसर्जनाच्या वेळी पोलीस बांधवानी एक गोस्ट कटाक्षाने पाळली ती म्हणजे विसर्जनावेळीपोलीस ठाण्यातील सर्व कर्मचारी हे खाकी नव्हते तर सफेद बंगाली कुर्ता ,पायजामा व डोक्यावर फेटे बांधत दिसून आले हा विशेष ड्रेस कोड घालून मिरवणुक काढत बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यात आला

व श्री क्षेत्र ऋणमोचान येथे पेढी नदीपात्रात बाप्पाचे विसर्जन करण्यात आले यावेळी पोलिस निरीक्षक राजेंद्र राजुलवार,पोलिस उपनिरीक्षक मोहन केवटी यांच्या पोलिस कर्मचारी उपस्थित होते.

## जिल्ह्यात 'सखी निवास' योजना बारगळली

### सहा पैकी चार संस्था पडल्यात बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**

केंद्र व राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत 'सखी निवास' ही योजना राबविली जात आहे. वेगवेगळ्या आस्थापनांमध्ये नोकरी करणाऱ्या महिलांना सुरक्षित निवारा मिळावा, या उद्देशाने ही योजना सुरू केली आहे. शासनाने नोकरी करणाऱ्या महिलांना राहण्यासाठी सखी निवास ही योजना सुरू केली आहे. या योजनेच्या लाभासाठी शासनाने काही अटी व शर्थींची पूर्तता करणाऱ्या व पात्र असलेल्या नोकरदार महिलांसाठी सखी निवास योजनेत या महिलेसमवेत १८ वर्षांपर्यंतची मुलगी व ५ वर्षांपर्यतचा मुलगा राहू शकतो. नोकरी



करणाऱ्या महिलांना सखी निवास सुविधा उपलब्ध करून दिली आहे. महिला बालकल्याण विभागाकडून उपलब्ध माहितीनुसार जिल्ह्यात ६ संस्थांमध्ये ही सुविधा सुरू केली होती. मात्र, यापैकी चार संस्था बंद पडल्या आहेत. आजघडीला २ संस्थांमध्ये नोकरी करणाऱ्या महिलांची राहण्याची व्यवस्था केली जात आहे. यामध्ये दोन्ही मिळून २३ महिला सखी निवास योजनेचा लाभ घेत आहेत.

**काय आहे सखी निवास योजना?**

राज्यातील वेगवेगळ्या भागांमध्ये नोकरी करणाऱ्या महिलांना सुरक्षित असा निवारा मिळावा, या उद्देशाने ही योजना सुरू केली आहे. अशा महिलांच्या निवासासाठी सध्या अतित्वात असलेल्या वसतिगृहाव्यक्तिरिक्त हे सखी निवास असतील. या योजनेला केंद्र शासनाच्या 'मिशन शक्ती' उपक्रमाचे साहाय्य मिळाले आहे. 'मिशन शक्ती' अंतर्गत 'संबल आणि सामर्थ्य या दोन उपयोजना राबविल्या जातात. त्यापैकी 'सामर्थ्य उपयोजनेअंतर्गत 'सखी निवास योजना कार्यान्वित करण्यासाठी अर्थसाहाय्य केले जाते. यात केंद्राचा ६० टक्के आणि राज्याचा ४० टक्के वाटा आहे.

**नोकरदार महिलांची सोय**

घरापासून दूर शहरांमध्ये अनेक महिला नोकरी करतात. त्यांना सुरक्षित निवारा मिळावा, या उद्देशाने शासनाने 'सखी निवास' ही योजना सुरू केली आहे. पूर्वी ही योजना महिला वसतिगृह या नावाने ओळखली जात होती. सखी निवासामुळे नोकरीदार महिलांची सोय होणार आहे.

**निकष काय ?**

या योजनेअंतर्गत नोकरी करणाऱ्या महिलांचे मासिक उत्पन्न ५० हजारांपेक्षा जास्त नसावे. संबंधित शहरात या महिलेच्या जवळच्या नातेवाइकांचे निवासस्थान नसावे. तीन वर्षांपेक्षा कोणत्याही महिलेला या योजनेचा लाभ घेता येणार नाही, आदी निकष पूर्ण करणाऱ्या नोकरदार महिला या योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत.

## धामणगाव मतदारसंघ आदिवासीं गोवारीना मिळणार घरकुल लक्षांक वाढविणार; आ. प्रताप अडसड यांचा पाठपुरावा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०नांदगाव खंडेश्वर**

धामणगाव रेल्वे ,चांदुर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर या तीन तालुक्यात लक्षांक नसल्याने मागील अनेक वर्ष घरकुला पासून वंचित असलेल्या आदिवासी गोवारीना आता घरकुल मिळणार आहे आमदार प्रताप अडसड यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

धामणगाव मतदार संघातील धामणगाव रेल्वे चांदुर रेल्वे नांदगाव खंडेश्वर या तीन तालुक्यात आदिवासीं गोवारी कुटुंबांची संख्या सर्वाधिक आहे या कुटुंबांना माती कुळाच्या च्या घरात राहावे लागत असल्याची कैफियत आदिवासी गोवारी जमात संघटनेचे कार्याध्यक्ष कृष्णा चौधरी यांच्या पुढाकारात कार्यकर्त्यांनी आमदार प्रताप अडसड यांच्यासमोर मांडली.आदिवासी गोवारी समाज सध्या स्थितीत विशेष मागास प्रवर्गात येतोइतर मागास बहुजन कल्याण विभागाने २७ सप्टेंबर २०२३ रोजी शासकीय अध्यादेश काढला मात्र लक्षांक कमी येत असल्याने अनेक आदिवासी गोवारी कुटुंबांना घरकुलापासून वंचित राहावे लागते असल्याचे कृष्णा चौधरी यांनी आ.प्रताप अडसड यांच्या लक्षात आणून दिले लगेच अडसड यांनी मंत्री अतुल सावे यांच्या शी संपर्क साधून मतदारसंघातील आदिवासी गोवारी कुटुंबांची घरकुलाबाबतची कैफियत मांडली जिल्ह्यात येणाऱ्या लक्षांकांमध्ये धामणगाव मतदार संघात अधिक लक्षांक येणाऱ्या काळात देणार असल्याचे त्यांनी सांगितलेयावेळी निवेदन देताना मंगेश चौधरी प्रफुल ठाकरे अविनाश राऊत मनोज कुसराम हरीदास राऊलशंतनु नेवारे, आयुष चौधरी,विलास बगडते ,गजानन चौधरीउमेश पोगळेरामदास नेवारेसंजय सोनोने प्रदीप वाघाडेउकडराव नेवारे मंदा नेवारेलिलाधर चौधरी,अरुण सोनोनेशरद अबुडारे ,प्रज्वल चौधरीकैपेश कालसर्पे विशाल अबंडारे प्रविण सविता नेवारेनिलेश नेवारे सचिन वाघाडेबादल वाघाडे भिमराव राऊत वेभव राऊत यांची उपस्थिती होती.

## काँग्रेसच्या जागा कुणामुळे वाढल्या? काँग्रेसचं राऊतांना जशास तसं उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२०मुंबई**

राज्याच्या राजकारणात महाविकास आघाडीत निवडणुकीआधीच धुसफूस वाढू लागली आहे. लोकसभा निवडणुकीत जास्त जागा जिंकल्याने काँग्रेसचा आत्मविश्वास वाढला आहे. काँग्रेसचे नेते आता थेट मुख्यमंत्रिपदावर दावा सांगू लागले आहेत. त्यांच्या या दाव्यातील हवा काढून घेण्याचं काम



खासदार संजय राऊत यांनी केलं. लोकसभा निवडणुकीत आमच्यामुळेच काँग्रेसच्या जागा वाढल्या आहेत. काँग्रेसनं लक्षात ठेवावे. मुख्यमंत्रिपदावर दावा करू नये असा इशारा संजय राऊत यांनी दिला होता. त्यांच्या या वक्तव्यानंतर काँग्रेसमध्ये अस्वस्थता वाढली आहे. त्यांच्या या वक्तव्यावर काँग्रेसचे आमदार बाळासाहेब थोरात यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे.

आमच्या प्रत्येकाच्या जागा एकमेकांमुळे वाढल्या आहेत. संजय राऊत प्रसारमाध्यमांना काहीतरी बातमी द्यायची म्हणून बोलले असतील. महाविकास आघाडीचाच मुख्यमंत्री होईल हाच आमचा शब्द आहे. मुख्यमंत्रिपदाच्या मुद्द्यावर महाविकास आघाडीत कोणताच तिढा निर्माण होणार नाही. ज्या जागा जिंकणार आहोत त्या जागांसाठी आग्रही असणं प्रत्येकाच्या दृष्टीने स्वाभाविक आहे, असे थोरात म्हणाले.

## वृद्ध कलावंतांचे प्रलंबित प्रस्ताव जुन्या निकषानुसार त्वरित निकाली काढा

### जिल्ह्यातील वृद्ध कलावंतांची मागणी : शेकडो कलावंतांवर उपासमारीचे सावट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

एकीकडे मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना सुरू करून शासनकर्ते मोठा गाजावाजा करीत असतानाच दुसरीकडे मात्र महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या आधी १९५४-५५ पासूनच सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई मार्फत सुरू करण्यात आलेल्या राजर्षी शाहू महाराज वृद्ध कलाकार/साहित्यिक मानधन योजनेचा शासनाकडून पार फज्जा उडाला असल्याची माहिती समोर आली आहे. सत्तेत रममाण महायुती सरकारच्या दुर्लक्षित व वेळकाढू धोरणामुळे दोन वर्षांपासून निवड समितीच गठित केली नसल्याने वृद्ध कलावंतांना गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे दोन वर्षांपासूनचे प्रलंबित असलेले प्रस्ताव, कलावंतांनी जुन्या नियमानुसार दाखल केले असल्याने आचार-संहिता लागण्यापूर्वी ते प्रलंबित प्रस्ताव जुन्या निकषानुसारच तातडीने निकाली काढण्यात यावे अशी मागणी जोर धरू लागली आहे.

शासनामार्फत मागील दोन-तीन वर्षांपासून जिल्ह्यात वृद्ध कलाकार/साहित्यिक मानधन निवड समितीच गठित न केल्याने निवड समितीच्या सभेअभावी शेकडो प्रस्ताव जिल्हा परिषद समाज कल्याण विभागात प्रलंबित असल्यामुळे वृद्ध कलावंतांना मानधना अभावी अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वेळोवेळी निवेदन देऊन ही बाब संबंधितांच्या निदर्शनास आणून देऊनही याचे गांभीर्य फारसे लक्षात घेतले जात नसल्याने त्याचा नाहक आर्थिक फटका मात्र वृद्ध कलावंतांना बसत आहे. निवड समिती गठित करण्याच्या प्रक्रियेसाठी शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष आणि वेळकाढू धोरणच कारणीभूत असल्याने वृद्ध कलावंतांनी दोन-तीन वर्षांपासून दाखल केलेल्या प्रस्तावांना अलिकडेच गठित करण्यात आलेल्या निवड समितीतर्फे, चालू वर्षापासून मंजुरी मिळत असेल तर कलावंतांचे आर्थिक नुकसान नव्हे काय? यात कलावंतांचा काय दोष?? असा प्रश्न उपस्थित केला जात असून कलावंतांनी जुन्या पद्धतीने प्रस्ताव दाखल केले असल्याने जुन्या नियमानुसारच प्रलंबित प्रस्ताव निकाली काढावेत अशी मागणी होत आहे.

केवळ कलेसाठीच जीवन समर्पित करून कुटुंबाचा चरितार्थ चालविणाऱ्या आणि विविध लोककला व सांस्कृतिक परंपरांची जोपासना करणाऱ्या शेकडो वृद्ध कलावंतांवर उपासमारीचे गंभीर संकट कोसळत आहे. केवळ शासनाच्या चुकीमुळे व दुर्लक्षितपणामुळे शेकडो कलावंतांचे आर्थिक नुकसान होत असून कलावंतांनी ज्या आर्थिक वर्षात प्रस्ताव दाखल केले आहेत, तेव्हापासून त्यांना मानधन मंजूर करण्यात यावे व वृद्ध कलावंतांना न्याय मिळवून देण्यासाठी तातडीने बैठक घेऊन निवडणूक आचार-संहिता लागण्यापूर्वी शासनाच्या जुन्या निकषानुसार प्रलंबित प्रस्ताव त्वरित निकाली काढावेत अन्यथा नाईलाजास्तव उपोषणाच्या शस्त्राचा आधार घेऊन आंदोलन करण्याच्या भूमिकेत कलावंत आले आहेत. वेळीच त्या त्या आर्थिक वर्षात निवड समितीचे गठन केले असते तर प्रस्ताव प्रलंबित राहिले नसते. अशी परिस्थिती निर्माण होण्यास केवळ शासन जबाबदार असल्यामुळे यापुढे कलावंतांचा अधिक अंत न पाहता पालकमंत्री महोदयांनी लक्ष घालून, वृद्ध कलावंतांच्या न्याय्य मागण्यांची गंभीरतेने दखल घेऊन समस्या तातडीने निकाली काढाव्यात, अशी आग्रही मागणी जिल्ह्यातील तमाम कलावंतांकडून केली जात आहे.

# धनगर आरक्षणासाठी सोमवारी होणार राज्यभरात रास्ता रोको




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**

राज्यात धनगर आरक्षणाचा वाद चांगलाच पेटला आहे. धनगर समाजाला आदिवासींच्या आरक्षणातून आरक्षण हवं आहे. मात्र, त्याला आदिवासी नेत्यांनी विरोध केला आहे. त्यामुळे दोन्ही समाज आमनेसामने आले आहेत. दोन्ही समाजाने आता सरकारवर दबाव वाढवण्याचं काम सुरू केलं आहे. उपोषणे सुरू आहेत. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर आरक्षणाचा वाद पेटल्याने सरकारची चांगलीच कोंडी झाली आहे. त्यातच आता धनगर समाजाचे नेते आणि भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी आरक्षणासाठी दंड थोपाटले आहेत. पडळकर यांनी थेट सोमवारी राज्यव्यापी रास्तारोको करण्याचं जाहीर केलं आहे. त्यामुळे आरक्षणाचा मुद्दा अधिकच तापण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

आमदार गोपीचंद पडळकर यांनी आज पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा केली. आदिवासी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता आरक्षण देण्याची आमची मागणी आहे. काही आमदार आणि नेते सातत्याने आरक्षणाच्या विरोधात बोलत आहेत. आंदोलन करत आहेत. मुंबईला येणारं पाणी अडवण्याची भूमिका आता त्यांनी घेतली आहे. त्यामुळे आताच ताकद दाखवण्याची वेळ आली आहे. राजकिय हेतूने प्रेरित होऊन जर कुणी राजकारण करत असेल तर अभी नही तो कभी नहीं, असा इशारा देतानाच राज्यात सोमवारी सकाळी ११ वाजता मोठा रास्ता रोको करा, असं आवाहनच गोपीचंद पडळकर यांनी केलं आहे.

**पंढरपूर, लातूरमध्ये उपोषण**

ऊपवर्गिकरण करण्यास मान्यता दिली पण सरकार वेळ काढू पण करत असेल तर ही गंभीर बाब आहे. जीआरबाबत सरकारने भूमिका घेतली पाहिजे, असं सांगतानाच पंढरपूर आणि लातूरमध्ये आमची उपोषणं सुरू आहेत. आता आम्ही सोमवारी रास्ता रोको करणार आहोत. शांततेच्या मार्गानेच रास्ता रोको करणार आहोत, असं गोपीचंद पडळकर म्हणाले.

# पुरवठा अधिकारी म्हणतात... तो प्लॅस्टिक तांदूळ नसून फोर्टिफाईड पौष्टिक तांदूळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**




रेशन दुकानात प्लास्टिकचे तांदूळ मिळत असल्याची तक्रार काही नागरिकांनी केली आहे. मात्र, हा फोर्टिफाईड पौष्टिक तांदूळ असून, राज्यातील सर्व रेशन दुकानांवर याचे वितरण सुरू असल्याची माहिती शिधावाटप अधिकाऱ्यांनी दिली.त्यामुळे रेशन दुकानात प्लास्टिकचे तांदूळ मिळत असल्याची तक्रार आता कोणत्याही नागरिकाने करू नये हे सांगायला सुद्धा अधिकारी विसरले नाहीत हे विशेष

रेशन दुकानावर प्लास्टिकचे तांदूळ मिळत असल्याचे जिल्ह्यातील काही नागरिकांचेही म्हणणे आहे. त्यामुळे आमच्या प्रतिनिधीने शिधावाटप अधिकाऱ्यांशी संवाद साधत याची माहिती घेतली असता या बाबत शिधावाटप अधिकाऱ्यांनी ते प्लाटिकचे तांदूळ नसल्याचे सांगितले.उलट हे जास्त पौष्टिक असलेले फोर्टिफाईड तांदूळ असल्याचे त्यांना सांगितले. त्यामुळे आता रेशन दुकानातील तांदुळात फोर्टिफाईड पौष्टिक तांदूळ मिक्स होणार आहे.

# जिल्हा प्रशासनाची विधान सभा निवडणुकीची तयारी जोरात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२० अमरावती**



अमरावती जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांसाठी ३ हजार ३४२ मतदान यंत्रे मतदान प्रक्रियेसाठी सज्ज केली आहेत. सध्या ही सर्व मतदारसंघाच्या शासकीय गोदामामध्ये सुरक्षित यंत्रे ठेवली आहेत.

जिल्ह्यातील २४ लाख ५४ हजार ८४८ मतदारांसाठी दोन हजार ६८२ मतदान केंद्रेही केली आहेत. विधानसभा आचारसंहिता केव्हाही लागली तरी प्रशासनाने मतदार यादी अंतिम करण्यासह निवडणुकीसाठीची आवश्यक तयारी जोरात सुरू केली आहे. राज्य सरकारचा कार्यकाळ येत्या २६ नोव्हेंबर रोजी संपणार आहे. राज्यात १५ ऑक्टोबरपूर्वी विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू शकते. याअनुषंगाने जिल्हा प्रशासनाने निवडणुकीची तयारी चालविली आहे.

**मतदान यंत्राची तपासणी आटोपली**

जिल्ह्यातील आठ विधानसभा मतदारसंघांसाठी मतदारयंत्रे आली असून विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधीसमोर यंत्राची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. यामध्ये १ ते २६ ऑगस्ट दरम्यान मतदान यंत्रणाची प्रथमस्तरीय तपासणी करण्यात आली. २७ व २८ ऑगस्ट रोजी विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधीसमोर मतदान यंत्रणावर मतदान यंत्रावर प्रात्यक्षिक घेण्यात आले.

**निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज**

विधानसभा निवडणुकीची मतदार यादी अंतिम केली आहे. मतदानाची केंद्रेही निश्चित आहेत. मतदान यंत्रांची तपासणी पूर्ण करण्यात आली आहे. मतदानाच्या दृष्टीने आवश्यक तयारी जवळपास अंतिम टप्प्यात आली असल्याचे जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले.

# राज्यातील २ हजार ८५६ कैद्यांनी पदवी आणि पदव्युत्तर पदवीपर्यंत केले शिक्षण पूर्ण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२० अमरावती**



मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांनी पदवी व पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेतल्यास त्यांना शिक्षेत सवलत दिली जाते. या योजनेंतर्गत राज्यभरातील १० कारागृहातील २ हजार ८५६ कैद्यांनी पदवी आणि पदव्युत्तर पदवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले आहे. यावर्षी पदवीचे शिक्षण पूर्ण करणार्या २१४ कैद्यांची ३ महिने तर पदव्युत्तर पदवी घेणार्या १४ कैद्यांची सहा महिन्यांची शिक्षा माफ करण्यात आली.

याबाबत पुणे कारागृह मुख्यालयातून मिळालेल्या माहितीनुसार, अनेक कैद्यांचे शिक्षण अर्धवट राहिलेले असते. काही कैद्यांना कारागृहात आल्यावर शिक्षणाची आवड निर्माण होते. त्यामुळे शिक्षण घेण्यास इच्छुक असलेल्यांना राज्य शासन संधी उपलब्ध करून देते. मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून कैद्यांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. २०१७ पासून २०२४ पर्यंत राज्यातील २ हजार ८५६ कैद्यांनी पदवी व पदव्युत्तर पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले . यात २ हजार १९९ पुरुष तर २०७ महिला कैदी आहेत. शिक्षण घेणार्या कैद्यांना शिक्षेत सवलत देण्यात आली आहे.

येरवडा, कोल्हापूर, नागपूर, अमरावती, मुंबई, तळोजा, ठाणे, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक मध्यवर्ती कारागृहात अभ्यासकेंद्र आहेत. त्यामध्ये बी.ए., एम.ए., बी.कॉम., एम.कॉम. हे अभ्यासक्रम आहेत. तसेच योगशिक्षक, बालसंगोपन, आरोग्यमित्र, मानवी हक्क आणि गांधी विचार दर्शन असे प्रमाणपत्र अभ्यासक्रमही आहेत. महिला कैद्यांसाठी ब्युटी पार्लर, शिवणकाम, शेती उत्पादन, इंटेरिअर डिझाईन डेकोरेशन, फोटोग्राफी, व्हिडिओग्राफी असे कौशल्यावर आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकवले जातात.

## अशी दिली जाते सूट

कारागृहात शिक्षा भोगताना अनेक कैदी पश्चातापाच्या अग्नीत जळत असतात. वागणुकीत सकारात्मक बदल असलेले कैदी शिक्षणाकडे वळतात. राज्य शासनाकडून पदवीचे शिक्षण घेणार्या कैद्यांना शिक्षेत तीन महिने सूट दिल्या जाते. तर पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेणार्या कैद्यांना शिक्षेत थेट सहा महिन्यांची सूट दिली जाते. कैद्यांना लवकर सोडल्यामुळे कारागृहातील कैद्यांची गर्दीसुद्धा कमी होत आहे, हे विशेष.

# मतदार यादी जाहीर होऊनही अनेकांनी अद्याप केली नाही आपल्या नावाची खात्री

## कुणी म्हणतात सध्या वेळ नाही : कुणी म्हणताहेत निवडणूक जवळ आल्यानंतर बघू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**



आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत जिल्हा प्रशासनाने मतदारयादी जाहीर करून दोन आठवडे होत आहेत. ही यादी सर्व मतदान केंद्र, तहसील कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालय व संकेतस्थळावरही उपलब्ध करून देण्यात आली. मात्र, अनेकांनी यादीकडे ढुंकूनही पाहिले नसल्याची माहिती आहे.कोणी म्हणते सध्या वेळ नाही आहे,तर कोणी म्हणते निवडणूक जवळ आल्यावर पाहू.

१ जुलै २०२४च्या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्र मतदारयादी ३० ऑगस्ट २०२४ रोजी जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्र, तहसील कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये,जिल्हाधिकारी कार्यालय तसेच https:// chanda.nic.in या संकेतस्थळावर बघण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.मतदारयादीत आपले नाव आहे की नाही, ते लगेच तपासावे, मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहणार नाही. निवडणुकीची घोषणा होईपर्यंत

नावनोंदणी किंवा नाव वगळणे ही प्रक्रिया सुरू राहते. त्यामुळे नागरिकांनी संबंधित ठिकाणी जाऊन नाव तपासावे, असे आवाहनजिल्हाधिकारी विनय गौडा यांनी केले होते. काही नागरिक यादी लावलेल्या स्थळापासून जातात. मात्र, त्याकडे पाहात नसल्याचे उघडकीस आले.

### ऐनवेळी धावाधाव करून उपयोग काय ?

लोकसभा निवडणुकीत आपले नाव मतदार यादीत नसल्याचे पाहून अनेकांनी प्रशासनावरच खापर फोडले होते. त्यामुळे ऐनवेळी धावधाव करून उपयोग काय, असा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

# विधानसभेला प्रमुख पक्षांपुढे बंडखोरी रोखण्याचे आव्हान

## उमेदवारांची नावे जवळपास निश्चित: स्वबळावर लढण्याचीही तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

राज्यामध्ये नवीन सरकार २८ नोव्हेंबर अगोदर स्थापन होणे आवश्यक आहे. त्यानुसार नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात विधानसभेसाठी मतदान होण्याची शक्यता आहे. या अनुषंगाने सर्व प्रमुख पक्षांकडून उमेदवारांची नावे निश्चित केली जात आहेत. यातील काही जणांना पक्षाने कामाला लागण्यास सांगितले आहे. मात्र इच्छुकांच्या गर्दीमुळे येणाऱ्या काळात बंडखोरी रोखण्याचे प्रमुख आव्हान सर्वच पक्षांपुढे राहणार आहे.

महाविकास आघाडीतील काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना आणि शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस या तिन्ही पक्षात जागा वाटप सुरू आहे. तर महायुतीमध्येही उमेदवारी निश्चित करण्यासाठी बैठकांवर बैठका होत आहेत. दुसरीकडे तिसऱ्या आघाडीसह वंचित बहुजन आघाडीतर्फेही सर्वच मतदारसंघात उमेदवार देण्यासाठीची रणनीती आखली जात आहे. यंदा विधानसभेसाठी दावेदार अधिक असल्याने अगदी शेवटच्या टप्प्यात उमेदवाराची नावे जाहीर होणार आहे. त्यातही प्रमुख पक्षातील नाराजानेबंडाचे निशाण हाती घेऊ नये, याबाबतची दक्षताही घेतली जात आहे. पक्षांतर्गत बंडखोरीमुळे होणारे नुकसान टाळण्याची रणनीती आखण्यात आली आहे.लोकसभेत महायुतीतील सर्व्हेचे गणित गडबडले. आता



तेथील घटक पक्षांनी सावध पवित्रा घेत आपल्या स्तरावर सर्व्हे केला आहे, तर आघाडीतही खासगी एजन्सीमार्फत विधानसभानिहाय इलेक्टिव्ह मेरीट कोणाचे राहणार, याबाबतचा आढावा घेतला आहे. या घटक पक्षाच्या सर्व्हेतून सर्वसमावेशक एक नाव निश्चित होणार आहे.महाविकास आघाडी व महायुतीतील इच्छुकांची संख्या सर्वाधिक आहे. हे पाहता पक्षाच्या उमेदवाराची घोषणा अगदी शेवटच्या क्षणी केली जाणार आहे, मात्र तत्पूर्वी संभाव्य उमेदवाराला पूर्ण ताकदीने तयारीला लागण्याचे संकेत दिले जात आहे. त्यातूनच काहींनी जाहीर प्रचारही हाती घेतला आहे.

**गुणवत्तेवरच उमेदवारी मिळणार**

महाविकास आघाडीसह महायुतीमध्येही यंदा उमेदवारीसाठी गर्दी झाली आहे. अशा स्थितीत एका नावावर एकमत घडवून आणण्याचे आव्हान प्रमुख पक्षांपुढे उभे आहे, दुसरीकडे बंडखोरी होणार नाही, या दृष्टीनेही पक्षश्रेष्ठींना नियोजन करावे लागत आहे. मात्र उमेदवार निवडून येण्याची क्षमता पाहूनच नाव निश्चित करण्यावर पक्षश्रेष्ठींचा भर आहे.

**निवडणुका बहुरंगी होण्याचे संकेत**

महाविकास आघाडी आणि महायुतीबरोबरच तिसऱ्या आघाडीचा प्रयोग जिल्ह्यात होऊ शकतो. दुसरीकडे वंचितसह एमआयएम आणि इतरही काही पक्ष मैदानात उमेदवार उतरवू शकतात. त्यातच इच्छुकांची संख्या अधिक असल्याने बंडखोरांचे पीकही उदंड येण्याची शक्यता आहे. त्यामुळे विधानसभेच्या निवडणुका बहुरंगी होण्याचे संकेत आहेत.

# डाक विभागात बाटली बंद पवित्र ‘गंगा जल’ विक्रीस उपलब्ध

## दर्यापूर,धामणगाव रेल्वे व परतवाडा येथील पोस्ट कार्यालयात सुद्धा उपलब्ध

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२०अमरावती**

भारतीय संस्कृतीमध्ये गंगा नदीचे जल, पवित्र जल म्हणून मानले जाते. अनेक धार्मिक विधींमध्ये या गंगाजलला विशेष महत्त्व आहे. धार्मिक कार्यात उपयुक्त पवित्र गंगाजलसाठी आता गंगोत्री किंवा ऋषिकेशला जाण्याची गरज नाही. केंद्र शासनाच्या योजनेनुसार डाक विभागामार्फत पोस्ट ऑफिसमध्ये गंगोत्री येथील बाटलीबंद गंगाजल संपूर्ण देशात उपलब्ध करून देण्यात आले आहे.

सध्या शहरातील मुख्य पोस्ट कार्यालयातसुद्धा हे गंगाजल विक्रीसाठी उपलब्ध आहे. त्यामुळे भाविक पोस्टामध्ये या संदर्भात चौकशी करण्यासाठी येत असून योजनेस चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. या योजनेमुळे नागरिकांना पोस्टातूनच गंगाजलची बॉटल उपलब्ध होत आहे.पूजा, धार्मिक विधीपूर्वी घराचे गंगाजल शिंपडून शुद्धीकरण केल्याने घरात निर्माण होणारी




नकारात्मक ऊर्जा नष्ट होते आणि सकारात्मक उर्जेचे आगमन होते. सोबतच सनातन धर्मात गंगा नदीला मातेचे रूप मानले जाते. यामुळे गंगाजलात स्नान केल्याने मनुष्य पापांपासून मुक्त होतो, अशीही धार्मिक मान्यता आहे. त्यामुळे गंगाजलला मागणी असते

**किंमत किती?**

गंगाजलच्या २५० मिलीच्या बाटलीसाठी ३० रुपये आकारले जातात. घरपोच ऑनलाइन ऑर्डर केल्यास १२१ रुपये आकारले जातात.

**कोठे मिळणार?**

शहरातील श्याम चौकातील मुख्य कार्यालयात हे गंगा जल उपलब्ध आहे यासोबतच व्हिएमव्ही परिसरात असलेल्या पोस्ट ऑफिस कार्यालय व कॅम्प स्थित असलेल्या पोस्ट ऑफिस कार्यालयात उपलब्ध आहे तर जिल्ह्या दर्यापूर,परतवाडा व धामनगव रेल्वे असलेल्या पोस्टाच्या मुख्याल- यातील व्यवसाय विकास विभागामध्ये गंगाजल विक्रीसाठी उपलब्ध आहे.

पोस्टाच्या https:// epostof- fice.gov.in या संकेतस्थळावर खाते उघडून आपली मागणी नोंदविता येईल. त्यानंतर नागरिकांना पोस्टाद्वारे घरपोच गंगाजल उपलब्ध केले जाईल, घरपोच सुविधा देण्याचे अतिरिक्त शुल्क आकारले जाते.